अस्सल सोलापुरी

# सुराज्य
सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | सोमवार, दि. ४ डिसेंबर २०२३ | वर्ष : २२ वे | अंक : ६५ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

## पाचव्या टी-२० सह भारताने मालिका ४-१ ने जिंकली

बेंगळुरू : ऑस्ट्रेलियाविरुद्ध झालेल्या पाचव्या आणि मालिकेतील अखेरच्या टी-२० सामन्यात भारताचा सहा धावांनी विजय झाला. अखेरच्या सामन्यातील विजयासह भारताने मालिका ४-१ अशी जिंकली. सूर्यकुमार यादवने कर्णधारपदाच्या पदार्पणाच्या मालिकेतच भारताला विजय मिळून दिला.

भारताने विजयासाठी दिलेल्या १६१ धावांचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाला २० षटकात ८ बाद १५४ धावा करता आल्या. ऑस्ट्रेलियाने नियमीत अंतराने विकेट गमावल्या. त्यांच्याकडून बेन मॅकडरमॉटने सर्वाधिक ५४ धावा केल्या. अखेरच्या षटकात ऑस्ट्रेलियाला विजायासाठी १० धावांची गरज होती. भारताकडून २०वी ओव्हर अर्शदीप सिंगने टाकले. त्याने पहिल्या दोन चेंडूत एकही धाव दिली नाही. तिसऱ्या चेंडूवर कर्णधार वेडला बाद केले. त्यानंतर अखेरच्या ३ चेंडूवर अर्शदीपने फक्त ३ धावा दिल्या आणि भारताला विजय मिळवून दिला. भारताकडून मुकेश कुमारने सर्वाधिक ३, अर्शदीप आणि रवी बिश्नोईने प्रत्येकी २ तर अक्षर पटेलने एक विकेट घेतली. त्याआधी बेंगळुरूच्या एम चिन्नास्वामी स्टेडियमवर झालेल्या लढतीत ऑस्ट्रेलियाने टॉस जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. भारताच्या डावाची सुरूवात यशस्वी जयस्वाल, ऋतुराज गायकवाड यांनी केली.





# जय हो! नमो...नमो...

## भाजपा सुस्साट, काँग्रेस सपाट; एक्झिट पोल झाले भुईसपाट

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**साऱ्या देशाचे लक्ष लागून राहिलेल्या चार राज्यांमधील विधानसभेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने राजस्थान, मध्य प्रदेश आणि छत्तीसगड या तीन राज्यांची सत्ता काबिज करून काँग्रेस या आपल्या कट्टर वैरी असलेल्या पक्षाला नामोहरम करून टाकले. राजस्थान आणि छत्तीसगडमधील काँग्रेसची सत्ता भाजपने हिसकावून घेतली तर मध्य प्रदेशची सत्ता राखून ठेवण्यात भाजपने यश मिळवले. तेलंगणात हवेत असलेल्या बीआरएसचा काँग्रेसने धुव्वा उडवला. या राज्याची सत्ता जिंकल्यामुळे काँग्रेसचे नाक वाचले. या राज्यातही भाजपने जोरदार मुसंडी मारली आहे. या निवडणुकांचे निकाल म्हणजे आगामी लोकसभा निवडणुकीची सेमीफायनल होती. ती भाजपने जिंकली आता फायनलचा सामनाही भलताच रंगणार असे दिसते. तीन राज्यांमधील मिळालेले हे यश भाजपला फायनलसाठी बूस्टर डोस ठरणार आहे.**

राजस्थानमध्ये ११५, मध्य प्रदेशमध्ये १६५ तर छत्तीसगडमध्ये ५६ जागा जिंकत भाजपने स्पष्ट बहुमत मिळवले. मिनी लोकसभा असे समजल्या जाणाऱ्या या निवडणुकित भाजपने जोरदार मुसंडी मारल्याचे स्पष्ट झाले आहे. अनेक एक्झिट पोलमध्ये काँग्रेस तीन राज्यांमध्ये सत्ता मिळवेल, अशी शक्यता वर्तवण्यात आली होती. ती आता खोटी ठरली असून भाजपने मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि राजस्थानमध्ये विजय प्राप्त केला. तर तेलंगणामध्ये काँग्रेसने सत्ता मिळवली.

गेल्या पाच वर्षापासून सत्तेत असलेल्या गेहलोत सरकारचा पराभव करून भाजपने राजस्थानच्या सत्तेची चावी स्वतःकडे घेतली. मुख्यमंत्री अशोक गेहलोत आणि सचिन पायलट यांच्यामध्ये सुरू असलेली राजकीय गटबाजी काँग्रेसला काही संपवता आलं नाही. त्यात भ्रष्टाचार आणि लाल डायरींचा मुद्दा गाजला. दुसरीकडे भाजपने हिंदुत्वाचं कार्ड खेळलं आणि त्याला यश आल्याचं दिसून आलंय. राजस्थानमध्ये भाजपपने ११५ जागा जिंकत स्पष्ट बहुमत मिळवलंय.

### मध्य प्रदेश

230/230 — 116 to win

| Party | Lead/Win |
|---|---|
| BJP | 164 |
| INC | 65 |
| SP | 00 |
| OTH | 01 |

### राजस्थान

197/199 — 100 to win

| Party | Lead/Win |
|---|---|
| BJP | 115 |
| INC | 69 |
| OTH | 11 |
| BSP | 02 |

### छत्तीसगड

90/90 — 46 to win

| Party | Lead/Win |
|---|---|
| BJP | 54 |
| INC | 35 |
| OTH | 01 |
| JCC | 00 |

### तेलंगणा

119/119 — 60 to win

| Party | Lead/Win |
|---|---|
| INC | 64 |
| BRS | 39 |
| BJP | 08 |
| OTH | 08 |

## गांधी नगरात अल्पवयीन तरुणीची आत्महत्या

सुराज्य/सोलापूर

अक्कलकोट रोडवरील गांधीनगर परिसरात राहणाऱ्या एका १५ वर्षीय अल्पवयीन तरुणीने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना शनिवारी रात्रीच्या सुमारास घडली. अक्षिता संतोषकुमार पसनूर (वय-१५, राघवेंद्र अपार्टमेंट, गांधीनगर) असे मयत झालेल्या मुलीचे नाव आहे. शनिवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास तिने राहत्या घरातील बेडरूममधील छताच्या पंख्याला ओढणीच्या सहाच्याने गळफास घेतली होती.

तिला फासातून सोडवून त्वरित शासकिय रुग्णालयात दाखल केले असता, ती उपचारापूर्वी मयत झाली. मयत अक्षिता ही नववी इयत्तेत शिकत होती. तिच्या पश्चात आई-वडील, भाऊ, एक बहीण असा परिवार आहे. या घटनेची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली. या मागचे कारण समजले नाही. तपास पोलीस करीत आहेत.

## सराफ व्यवसायिकाला तीन लाखास गंडविले

सुराज्य/सोलापूर

सराफ कट्ट्यावर एका इसमाने चलाखी करुन सराफ व्यवसायींकाकडून तीन लाखाची रोकड घेऊन फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे.

याबाबत सराफ व्यावसायिक उदय शरदराव कुलथे (वय-३९, भवानी पेठ, मड्डी वस्ती) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून (७०५८३३२१९२) या क्रमांकाचा मोबाईल धारक हर्षल नामक व्यक्तींविरुध्द फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

फिर्यादी कुलथे यांचे सराफ कट्टा, मधला मारुती येथे अभय कुलथे नावाचे सोन्याचे दुकान आहे. मुथ्थुट फायनान्स (शीतल हॉटेलशेजारी) येथील व्यवस्थापक गुरुदत्त वाघमारे यांच्याशी त्यांची ओळख आहे. वाघमारे यांनी जर कोणी ग्राहक सोने इतरत्र गहाण ठेवण्यासाठी आले किंवा त्यांनी इतरत्र सोनारांकडे सोने गहाण ठेवले असेल तर त्यांना फायनान्समध्ये कमी व्याजदराने कर्ज देऊ, त्यासाठी तुम्ही मदत करा, असे सांगितले होते. त्यांना फायनान्समधून रक्कम मिळेपर्यंत रकमेची व्यवस्था करीत जा, त्यापोटी फिर्यादीला एक टक्के ग्राहकांकडून कमीशन देण्यात येईल, असे सांगितले. दरम्यान, घटनेच्यादिवशी (७०५८३३२१९२) या नंबरवरुन फिर्यादीस कॉल आला. त्यांनी मी हर्षल बोलतो आहे, मला फायनान्स येथील साहेबांनी तुमचा नंबर दिला आहे, माझे सोने सोडविण्यासाठी साहेबांनी सांगितल्याप्रमाणे २ लाख ९० हजार रुपये द्या.

मी फायनान्स ऑफिसच्याखाली थांबलो आहे, असे कळविल्याने फिर्यादींसोबत सौरभ जोजारे हे फायनान्स ऑफिसखाली दाखल झाले. तेथून वरील क्रमांकावर कॉल केला असता एक ३० ते ३५ वर्षे वयाचा इसम फोनवर बोलत फिर्यादीकडे आला, मीच हर्षल आहे. माझेच सोने सोडविण्यासाठी फोन केला होता.

सदरची रक्कम माझ्याकडे द्या, असे सांगितल्याने फिर्यादीने ती रक्कम त्याच्या ताब्यात दिली. त्याने सदरची रक्कम घेऊन आपण सराफाकडे जाऊ, असे म्हणाल्याने, फिर्यादी बाजूला लावलेली गाडी वळवून घेईपर्यंत आरोपी इसम हा तेथून निघून गेला. त्याचा फिर्यादीने शोध घेतला असता तो सापडला नाही. त्याच्या मोबाईल क्रमांकावर संपर्क केला असता, तो बंद लागला. यानंतर आरोपींविरुध्द फिर्यादीने फसवणुकीची फिर्याद दिली आहे. तपास पोलीस निरीक्षक विकास देशमुख हे करीत आहेत.

## इंदापुरात तीन म्हशी चोरून नेताना ट्रकसह दोघांना अटक

सुराज्य/सोलापूर

घरासमोर बांधलेल्या दोन शेतकऱ्यांच्या १ लाख ९० हजार रुपये किंमतीच्या तीन म्हशी चोरून नेताना नागरिकांनी ट्रकचा पाठलाग करून दोघा चोरट्यांना अटक केली. ही घटना इंदापूर (बार्शी) येथे शनिवारी पहाटेच्या सुमारास घडली.

यासंदर्भात राजाभाऊ दशरथ मस्के (इंदापूर) यांनी वैराग पोलिसात फिर्याद दिली. पोलिसांनी गणेश संजय पवार (वय-२१), अविनाश छगन काळे (वय-२२, ढोकी, धाराशिव) यांच्यासह चौघांविरुद्ध गुन्हा नोंदवत दोघांना अटक केली. गणेश पवार, अविनाश काळे यांच्यासह चौघांनी इंदापुरातील राजाभाऊ म्हस्के यांच्या घरासमोर बांधलेल्या दोन म्हशी तर त्यांचे मित्र काकासाहेब जाधव यांच्या घरासमोर बांधलेली एक म्हैस अशी तीन जनावरे (एम.एच.०४-एफ.यु.-३०४१) ट्रकमध्ये भरून चोरून नेत होते. जनावरांच्या आवाजाने गावातील काही लोकांना जाग आली. तोपर्यंत चोरटे ट्रक घेऊन पसार झाले होते. नागरिकांनी त्यांच्या पाठलाग करून ट्रक अडवला. दोघा चोरट्यांना ताब्यात घेऊन पोलिसांच्या स्वाधीन केले.

## वाखरीत मोटारीची धडक

सोलापूर : वाखरी (पंढरपूर) येथे वेगाने जाणाऱ्या स्कॉर्पिओ मोटारीच्या धडकेने दुचाकीवरील तरुण गंभीर जखमी होऊन मरण पावला. हा अपघात शनिवारी सायंकाळच्या सुमारास घडला. या प्रकरणात पंढरपूर ग्रामीणच्या पोलिसांनी मोटार चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

शिवराज संतोष लवटे (वय-२१, शाहीर मळा, वाखरी, पंढरपूर) असे मयत झालेल्या तरुणाचे नाव आहे. तो शनिवारी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास आपल्या दुचाकीवरून पंढरपूर ते वेळापूर रोडने घराकडे निघाला होता. त्यावेळी (एम. एच. ४२- के. ९९९३) ही स्कॉर्पिओ मोटर पाठीमागून धडकल्याने तो दुचाकीसह रस्ता दुभाजकावर आदळून उपचारापूर्वी मयत झाला. या प्रकरणात पंढरपूर ग्रामीणच्या पोलिसांनी स्कॉर्पिओ मोटार चालक अब्दूल बालासाहेब शेख (बारामती, पुणे) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. तपास हवालदार चौगुले करीत आहेत.

## म्हैसलगीतील शेतात तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

सुराज्य/सोलापूर

म्हैसलगी (दक्षिण सोलापूर) येथे एका २० वर्षीय तरुणाने शेतातील झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना रविवारी सकाळच्या सुमारास उघडकीस आली.

लालू रामसिंग भैराळे (वय-२०, म्हैसलगी, मूळ रा. मंगरूळ, जळगाव) असे मयत झालेल्या तरुणाचे नाव आहे.

रविवारी सकाळी सात वाजण्याच्या सुमारास त्याचा मृतदेह म्हैसलगी येथील कोंडिबा भोई यांच्या शेतातील लिंबाच्या झाडाला दोरीच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. त्याला फासातून सोडवून काळू सोलंकी (भाऊजी) यांनी सोलापुरातील शासकिय रुग्णालयात दाखल केले होते. मात्र तो उपचारापूर्वी मयत झाला. या घटनेची प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली असून, या मागचे कारण समजले नाही.

## मैंदर्गीत कुऱ्हाडीने मारहाण; तरुण जखमी

सोलापूर : अज्ञात कारणावरून एका तरुणास कुऱ्हाडीने वार करून जखमी केल्याची घटना अक्कलकोट तालुक्यातील मैंदर्गी येथे रविवारी पहाटेच्या सुमारास घडली. समर्थ रमेश चिकळ्ळी (वय-२३, मैंदर्गी) असे जखमी तरुणाचे नाव आहे. तो शनिवारी मध्यरात्री एका धाब्यावर जेवण करण्यासाठी गेला होता. त्यावेळी समर्थ सुर्यकांत शावरी याने त्याला कुऱ्हाडीने मारहाण केली. त्याला अक्कलकोट येथे प्रथम उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात वडिलांनी दाखल केले.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



मतमोजणी ऐकत, विश्वसुंदरी स्पर्धा बघत होतो!

## तेलंगणातील बीआरएसची हवागुल...

# सोलापुरातील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता

सुराज्य/सोलापूर

तेलंगणाचे तत्कालीन मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांच्या बीआरएस अर्थात भारतीय राष्ट्र समिती या पक्षाला त्यांच्याच होम ग्राउंडवर पराभवाला सामोरे जावे लागले आहे. काँग्रेसने त्यांचे चांगलेच पानिपत केले आहे. गेली पाच वर्षे असलेली बीआरएसची सत्ता उलटवून टाकली आहे. त्यामुळे केसीआर यांची हवा तेलंगणा मधून गूल झाली आहे.

तेलंगणा बाहेर इतर राज्यांमध्ये आपल्या पक्षाची पायामुळे फिक्स करण्यासाठी केसीआर राव यांनी मोठा झंजावात केला होता. सोलापुरात देखील या ५०० गाड्या घेऊन मोठ्या दिमाखात पक्षाचे लॉन्चिंग केले होते. त्यामुळे सोलापूर शहरात तसेच जिल्ह्यामध्ये अनेक नेते मंडळींनी केसीआर यांच्या बीआरएस पक्षामध्ये प्रवेश केला होता. मात्र तेलंगणातून नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये केसीआर यांच्या पक्षाचा तेलंगणा राज्यात पराभव झाल्यामुळे आता सोलापुरातील राजकीय समीकरणे देखील बदलणार असल्याची शक्यता आहे.

'आपकी बार किसान सरकार' हा नारा देत केसीआर यांनी तेलंगणा नंतर महाराष्ट्र राज्यामध्ये देखील आपल्या पक्षाची ध्येय धोरणांच्या जोरावर पक्षाचे कार्यक्षेत्र विस्तारण्याचा प्रयत्न केला होता. सोलापूर शहर जिल्ह्यावर त्यांनी लक्ष केंद्रित केले. पंढरपुरातील अभिजित पाटील यांना पक्षांमध्ये घेऊन मोठा झंजावात केला तसेच आषाढी वारीच्या निमित्ताने विठ्ठलाच्या भेटीला येऊन तब्बल ५०० गाड्या घेऊन सोलापूर जिल्हामध्ये मोठा झंजावात केला होता.

तेलगू समाज त्यांच्या पाठीमागे मोठ्या खंबीरपणे उभा राहिला होता. अनेक तेलुगू बांधवांनी केसीआर यांच्या पाठीमागे राहत त्यांच्या पक्षांमध्ये प्रवेश केला होता. तसेच भाजपाच्या काही शहरातील पूर्व भागाला लक्ष केंद्रित केसीआर यांनी पूर्व भागातील नेते पद्मशाली समाजातील मंडळींना एकत्र करून आगामी स्थानिक स्वराज्य संस्था, विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर चांगलीच साखर पेरणी केली होती. त्यांना यश देखील आले होते.

पंढरपूर विधानसभा मतदारसंघातून देखील अभिजित पाटील यांच्या रूपाने नवा चेहरा बीआरएसला मिळाला होता. तसेच दक्षिण सोलापुरात देखील त्यांनी मोठा झंजावात निर्माण करत दक्षिण सोलापूर तालुक्यातील तब्बल १०० ग्रामपंचायत सदस्य आणि सरपंचांनी थेट तेलंगणा गाठून बीआरएस पक्षाच्या गाडीमध्ये बसून आपला प्रवास सुरू केला होता. भाजपला मोठा धक्का दिला होता. मात्र नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये काँग्रेस पक्षाने बीआरएसचा दारुण पराभव केला आहे काँग्रेसच्या हाती स्पष्टपणे बहुमत आले आहे. दुसऱ्या क्रमांकावर बी आर एस पार्टी राहिली आहे. त्यामुळे तेलंगणाच्या विकासाच्या धोरणावर विश्वास ठेवून सोलापूर शहर जिल्ह्यातील गेलेल्या गेलेल्या नेतेमंडळींचा आता काय होणार? सोलापुरातील राजकारणातील ही समीकरणे बदलार का ? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

बीआरएस पक्षाचे प्रवक्ते नागेश वल्याळ य यांना विचारणा केली असता त्यांनी राजकारणामध्ये हार जीत होतच राहते सत्ता गेली म्हणून राजकारणापासून दूर राहता येत नाही.

सोलापूर शहर जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था आणि विधानसभा निवडणुकीच्या तयारी लागण्याचे आदेश आम्हाला दिले दिले आहेत. त्यामुळे आम्ही आता सोलापूर शहरात पक्षाच्या माध्यमातून पुन्हा जोमाने कामाला लागणार आहे.

आम्हाला वेळ देणारी तेलंगणातील नेते मंडळी कमी होती आता ४० आमदारांकडे वेळच वेळ आहे त्यामुळे आम्ही सर्व लक्ष सोलापूर शहर

# पुन्हा दारुण अवस्था

चार राज्यांमधील विधानसभा निवडणुकीतील कौल स्पष्ट झाला असून केंद्रातील भारतीय जनता पक्षाने उत्तर भारतातील मध्यप्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगड या उत्तर भारतातील तीन राज्यांची सत्ता ताब्यात घेऊन आपली राजकिय मांड पक्की असल्याचे विरोधकांना दाखवून दिले आहे. छत्तीसगडची सत्ता गेल्यामुळे हिंदी पट्ट्यातून काँग्रेस आऊट झाली आहे. तेलंगणात बहुमत मिळवल्याने काँग्रेसची अब्रू थोडी वाचली असे म्हणावे लागेल. मध्यप्रदेश आणि छत्तीसगड येथे काँग्रेसचीच सत्ता येईल, असा एक्झिट पोलचा अंदाज खरा खोटा ठरला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पायाला भिंगरी लावून हे तीनही राज्य पिंजून काढले. विरोधकांच्या टीकेकडे लक्ष न देता केलेल्या विकास कामांवर त्यांनी भर दिला. १९८० नंतर पहिल्यांदाच उत्तर भारतातील कोणत्याही हिंदी पट्ट्यातील राज्यात सत्ता नाही, सर्व राज्यात काँग्रेसचा पराभव झाल्याचे चित्र आहे. मध्यप्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगडच्या निवडणुकांमध्ये काँग्रेसचा दारुण पराभव झाला. मध्यप्रदेशमध्ये आणि छत्तीसगडमध्ये काँग्रेसला अपेक्षा असतानाही त्यांना जनतेने झिडकारले. मध्यप्रदेश आणि छत्तीसगडमध्ये काँग्रेसच्या पराभवाची सर्वाधिक चर्चा होत आहे. पक्षाच्या अंतर्गत अहवालात या राज्यांमध्ये विजयाचा दावा करण्यात आला होता. खुद्द राहुल गांधींनी मध्यप्रदेशात १३५ जागा मिळण्याचा दावा केला होता. त्याचवेळी अनेक सर्वेक्षणांमध्ये छत्तीसगडमध्ये काँग्रेसची मजबूत स्थिती दिसून येत होती. काँग्रेसच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, परंपरेनुसार पक्ष पराभवाचा आढावा घेऊन लोकसभा निवडणुकीची तयारी करणार आहे. मात्र, निवडणुकीतील पराभवाच्या आढाव्याचा मुद्दा काँग्रेससाठी नवीन नाही. राहुल गांधी यांनी गेल्या ९ वर्षात १२ पराभवानंतर आढावा घेतला होता. यावेळीही पराभवाला प्रादेशिक नेत्यांपेक्षा काँग्रेस हायकमांडच अधिक जबाबदार असल्याचे राजकिय जाणकारांचे म्हणणे आहे. काँग्रेसच्या पराभवाची तीन कारणे समोर आली आहेत. काँग्रेस हायकमांड, विशेषत: मल्लिकार्जुन खर्गे आणि राहुल गांधी यांच्या जोडीला हिंदी पट्ट्यातील राज्यांतील निवडणुकांपूर्वी गटबाजी आटोक्यात आणता आली नाही.



छत्तीसगडमधील निवडणुकीच्या काही महिन्यांपूर्वी, पक्षाने टीएस सिंहदेव यांचे राजकीय महत्त्व वाढवले, त्यामुळे भूपेश बघेल गट बॅकफूटवर गेला. मुख्यमंत्रिपदासाठी त्यांची उमेदवारी जाहीर न केल्याने त्याचाही काँग्रेसला दणका बसल्याचे सांगण्यात येते. छत्तीसगडमध्ये निवडणुकीपूर्वी काँग्रेसने 'भूपेश है तो भरोसा है'चा प्रचार केला होता, त्याचे अनेकांकडून कौतुक होत होते. मात्र, पक्ष हायकमांडच्या निर्णयानंतर ही घोषणा बदलण्यात आली. 'काँग्रेस है तो भरोसा है' असा नारा देत पक्ष निवडणुकीच्या रिंगणात उतरला. कमी वेळेमुळे ही घोषणा लोकांवर प्रभाव टाकू शकली नाही. राजस्थानमध्येही काँग्रेसला अंतर्गत गटबाजी संपवता आली नाही. अशोक गेहलोत समर्थक नेत्यांच्या अनेक जागांवर सचिन पायलट प्रचाराला गेले नाहीत. राजस्थानमध्ये अशोक गेहलोत आणि सचिन पायलट यांची कोणतीही संयुक्त रॅली काँग्रेस स्वतंत्रपणे आयोजित करू शकली नाही. मध्यप्रदेश आणि छत्तीसगडमध्ये भाजपने निवडणुकीच्या ३ महिने आधी तिकीट जाहीर केले. परंतु काँग्रेस हायकमांड तसे करण्यात अपयशी ठरले. काँग्रेसच्यावतीने संघटनेचे सरचिटणीस केसी वेणुगोपाल यांनी पक्ष सप्टेंबरपर्यंत सर्व जागांवर तिकीट जाहीर करेल असा दावा केला होता, मात्र हा दावाही खोटा ठरला. मध्य प्रदेशात तिकीट वाटपावरून दिग्विजय आणि कमलनाथ आमनेसामने आले. राजस्थानमध्ये तिकीट वाटपाच्या शेवटच्या टप्प्यात काँग्रेस निवडणूक समितीच्या बैठकीतून राहुल गांधी गायब झाले. निवडणूक राज्यांमध्ये काँग्रेसची देखरेख यंत्रणा कमकुवत निवडणुकीवर लक्ष ठेवण्यासाठी काँग्रेसने वरिष्ठ निरीक्षकांची नियुक्ती केली होती. परंतु ते संपूर्ण निवडणुकीच्या दृश्यातून गायब झाले.सनातन धर्मावरील टीकाही काँग्रेसला भोवली. आज काँग्रेसला सनातन धर्माच्या विरोधातला पक्ष म्हणून ओळखले जाऊ लागले आहे. हे दुर्दैवी आहे. काँग्रेसने अशा वामपंथी नेत्यांना वेळीच बाजूला केले नाही तर काँग्रेसचे अवस्था लवकरच एमआयएम या पक्षासारखी होईल, असा इशारा पक्षातील नेत्यांकडून दिला गेला आहे. काँग्रेसची अवस्था पुन्हा दारुण झाली आहे. तेलंगणात बीआरएसची हवा निघून गेली. मतदारांनी केसीआरचे पाय जमिनीवर आणले. बीजेपीने सेमी फायनल जिंकली असून आता मिशन फायनलकडे लक्ष असेल.

राजकीय

# 'महाराष्ट्र धर्माचे' भान आहे का?

एका बाजूने आरक्षणासाठी मराठा, धनगर, लिंगायत समाज उतरला असताना दुसऱ्या बाजूने राज्यात गेल्या काही महिन्यांपासून जवळपास बहुतांश जिल्ह्यात कधी टिपू सुलतान, कधी वादग्रस्त स्टेट्स तर कधी बेताल वक्तव्यांनी चांद्यापासून बांद्यापर्यंत उभा महाराष्ट्र हिंदू विरुद्ध मुस्लीम दंग्यात पेटवण्याचा प्रत्यक्ष तर कधी अप्रत्यक्ष प्रयत्न झाला. मात्र, अनेक अनुभवांनी होरपळून निघालेल्या महाराष्ट्रातील जनतेनं भीक यातली नाही. राज्यातील २३ जिल्हे संवेदनशील म्हणून जाहीर झाले. यामध्ये कोणताही दुजाभाव न करता गुण्यागोविंदाने राहणाऱ्या जिल्ह्यांचाही समावेश होता. मात्र, गेल्या काही दिवसांपासून परिस्थिती आणखी चिंताजनक होत चालली आहे.

> **चीनने भारताच्या पाठीत खंजीर खुपसल्यानंतर तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनी स्वतंत्र महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांना संरक्षणमंत्रिपदाची जबाबदारी दिल्यानंतर अवघ्या मराठी मुलुखात हिमालयाच्या मदतीला सह्याद्री धावला, अशी गर्जना झाली होती. जेव्हा जेव्हा या भारतभूमीवर संकट आले तेव्हा महाराष्ट्राची माती छातीचा कोट करून उभा राहिली. त्याच महाराष्ट्राच्या अस्मितेवर आता ओरखडे पडू लागले आहेत. हा महाराष्ट्र कधी नव्हे तो अस्मितेच्या राजकारणात होरपळतो आहे. समर्थ रामदास १७व्या शतकात म्हणून गेले आहेत, 'महाराष्ट्र धर्म वाढवावा'. मात्र, त्याचाच विसर राज्यकारभार हाकणाऱ्या मंत्र्यांनाच पडावा, ही या महाराष्ट्राची शोकांतिका होत चालली आहे.**

**भुजबळांना मंत्रिपदाचे भान आहे का?**

ही सर्व परिस्थिती असतानाच गेल्या काही दिवसांपासून कोणतेही कारण नसताना, कोणतेही मतभेद नसताना मराठा विरुद्ध ओबीसी वाद लावून राजकिय पोळी भाजून घेण्यास सुरुवात झाली आहे का? इतकी भडक वक्तव्ये होत आहेत. अगदी एकमेकांची लायकी आणि सासुरवाडीच्या तुकड्यावर जगत नाही म्हणण्यापर्यंत मजल गेली. या सर्व घडामोडीत सर्वाधिक केंद्रस्थानी आहेत राज्य सरकारमधील ज्येष्ठ मंत्री, नेते छगन भुजबळ. भुजबळ यांनी गेल्या काही दिवसांपासून केलेली वक्तव्ये पाहता ते खरंच मंत्री आहेत का? आणि असतील तर त्यांना मंत्रिपदाचे भान आहे का? आणि असेल तर मंत्रिपदाची शपथ घेतली होती त्याचं काय? महाराष्ट्र धर्माचा विसर पडला का? अशी शंका येऊ लागली आहे. त्यांच्या दुटप्पी राजकारणामुळे दोन समाजात उभी फूट पडत चालली आहे. जो विषयच मुळात नव्हता त्या विषयाकडे जाऊन डोकी फुटायची वाट पाहत आहेत का? अशी सुद्धा शंका आहे.

**ज्येष्ठ मंत्र्यांनी बोलण्याची जागा नेमकी कोणती?**

मराठ्यांना ओबीसीमधून आरक्षण मिळावे, यासाठी मनोज जरांगे-पाटील यांनी लोकशाहीने दिलेल्या मार्गांनी आंदोलने करून सरकारला धारेवर धरले आहे. कोणी आंदोलन केलं म्हणून लगेच आरक्षण मिळणार आणि आपलं जाणार अशी कोण आरोळी उठवत असेल, तर त्या राजकारणाची आणि राजकिय समजची 'इयत्ता' नेमकी किती? हे विचारण्याची वेळ आली आहे. स्वपक्षातील नेत्यांपासून ते मंत्र्यांपर्यंत भुजबळांची कानउघाडणी होत असताना हे थांबायचं नाव घेत नसतील तर यातून नेमकी कोणती चाल आहे आणि कोणता डाव साध्य करायचा आहे? असाही प्रश्न पडतो. शिवसेनेतून सुरुवात मग काँग्रेसमध्ये प्रवेश त्यानंतर शरद पवारांची साथ आणि आता थेट ज्या विचारधारेला आयुष्यभर विरोध केला त्याच विचारधारेला जुळवून घेत मांडीला मांडी लावून अजित पवार गटातून छगन भुजबळ मंत्री झाले. इतकंच नव्हे, मंत्रिपद भोगत असतानाही त्यांनी समता परिषदेतून आपली स्वतंत्र चूल मांडून ओबीसी राजकारणाचा सातत्याने प्रयत्न केला. यावरून त्यांच्या चतुर राजकारणाचा अंदाज येतो.

अजित पवार बाहेर पडल्यानंतर पहिल्यांदा भुजबळ यांनी शरद पवारांवर वैयक्तिक स्तरावरून टीका करत आपल्या भूमिकेचं समर्थन केले. त्यामुळेही त्यांना टिकेचे धनी व्हावे लागले. यानंतर आता त्यांनी तीच भूमिका घेत मनोज जरांगे पाटील यांच्या बाबतीत घेतली आहे. ज्या समाजानं मोठं केलं, त्या समाजाची बाजू मांडणं, त्यांच्या हक्कांसाठी उभं राहणं हे कर्तव्य आहेच. यासाठी सुदैवाने छगन भुजबळ यांच्याकडे राजकीय अनुभव आणि मंत्रिपदही आहे.



त्यामुळे समाजाची बाजू मांडण्यासाठी त्यांच्याकडे कॅबिनेट आहे. त्यांचेच नेते अजित पवार उपमुख्यमंत्री आहेत. फुटून आलेल्या नऊ जणांकडे मंत्रिपद आहे. इतकंच ज्यांच्या मांडीला मांडी लावून बसले आहेत त्या भाजपच्या राजकारणाचा पायाच मुळात ओबीसी राजकारणात आहे. भाजपचा गल्लीपासून दिल्लीपर्यंत ओबीसी जप सुरू असताना तसेच राज्यातील सत्ताधारी असताना ओबीसी राजकारणाला किंवा आरक्षणाला धक्का लागू देतील का? असा प्रश्न सुद्धा उपस्थित होतो. मोदी सरकारकडून याच हिवाळी अधिवेशनात ओबीसी विधेयक मांडण्यासाठी तयारी सुरू आहे. लोकसभेच्या तोंडावर ओबीसींना नाराज करण्याची हिंमत भाजप करेल का? असाही प्रश्न उपस्थित होतो.

मराठा समाजाच्या पाहणीसाठी ज्या शिंदे सरकारने शिंदे समिती नेमली, त्या सरकारचा भाग स्वत: छगन भुजबळ आहेत, तरीही ती समितीच रद्द करा, अशी मागणी सभेच्या व्यासपीठावरून करायची? हे कोणत्या संसदीय राजकारणाच्या व्याख्येत बसते याचं उत्तर भुजबळ यांनी द्यायला हवे. तुम्ही आणि आम्ही म्हणून मराठा आणि ओबीसीमध्ये फूट पाडली जात आहे यामध्ये महाराष्ट्र धर्माचे काय? याची जाणीव त्यांना नाही का? असाही सवाल उपस्थित होतो.

भुजबळ यांनी घेतलेल्या भूमिकेमुळे आता सरकारमधील मंत्र्यांना सुद्धा स्पष्टीकरण देत कान टोचण्याची वेळी आली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तोंड सांभाळून बोलण्याचा सल्ला दिला आहे. भाजपने अजूनही भूमिका स्पष्ट केलेली नाही. वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, शंभुराज देसाई, खासदार सुप्रिया सुळे यांनीही भुजबळाच्या भूमिकेला विरोध केला आहे. महसूल मंत्री विखे-पाटील यांनी भुजबळ यांनी मंत्रिमंडळातून राजीनामा देऊन बाहेर येऊन बोलले पाहिजे, असा थेट सल्ला दिला आहे. यावरून भुजबळांच्या वक्तव्यांची आणि भूमिकेची अडचण लक्षात येते.

मराठा आरक्षणासाठी आजच मागणी होत नसून ती १९८२ पासून आजतागायत होत आली आहे. कायदेशीर गटांगळ्या खाण्यापासून ते पार राजकीय इच्छाशक्तीचा अभाव इथंवर आरक्षणाचा प्रवास झाला आहे. शांततेत मोर्चे काढूनही समाजाची मागणी पूर्ण झालेली नाही. जे आरक्षण सरकारने दिलं, ते न्यायालयात टिकलं नाही. त्यामुळे सत्ताधारी आणि विरोधकांकडून चिखलफेक सुरू आहे. हे होत असतानाही मराठा आरक्षण मिळालं पाहिजे यापलीकडे कोणीच थेट भूमिका घेतलेली नाही. कोणालाही कोणाविरोधात भडकवण्याची गरज नाही, याचं भान भुजबळांनी सर्वाधिक राखण्याची गरज आहे. मनोज जरांगे-पाटील आंदोलन करत असले, तरी ते कोणत्याही पदावर नाहीत, हे सुद्धा भुजबळांनी लक्षात ठेवायला हवे.

– परशराम पाटील.

टुडेज् ब्लॉग


# 'या' चार गोष्टींमुळे होतात चुका

**स्टॉक मार्केटमधील गुंतवणूक ही जितकी जास्त नफा मिळवून देणारी, आनंददायी असू शकते तितकीच ती भयावहही असू शकते. गुंतवणूक करून आपली संपत्ती वाढवण्यासाठी स्टॉक मार्केट हा पर्याय प्रत्येकाला खुणावत असतो, पण वृद्धीच्या या मार्गात अनेक खड्डे आहेत. भारतासारखं प्रचंड क्षमता असलेलं अवाढव्य स्टॉक मार्केटही याला अपवाद नाही. स्टॉक मार्केटमध्ये गुंतवणूक करताना अनेक चुका होतात. या चुका पुरेसं ज्ञान नसल्यामुळे होतातच, परंतु त्याहीपेक्षा गुंतवणूक करताना भावनेच्या आहारी गेल्यामुळे त्या चुका होतात. स्टॉक मार्केटमध्ये घातक ठरतील अशा चार गोष्टी कोणत्या हे आपण जाणून घेऊ.**

लोभ : स्वतःची संपत्ती वाढवण्यासाठी विवेक बाजूला ठेवून विचार करण्याची प्रवृत्ती.

प्रसंग : भारतीय स्टॉक मार्केटमध्ये अधूनमधून तेजीच्या लाटा येत असतात. अशा वेळी शेअर्स विकत घेण्याचं प्रमाण वाढतं. प्रत्येक जण वाढणारा शेअर विकत घेऊ इच्छित असतो. खरेदीची ही लाट संसर्गजन्य असते. आपल्याकडे असलेल्या शेअर्सच्या किमती वाढत असल्याचं पाहून गुंतवणूकदारांमध्ये एक वेगळाच आत्मविश्वास तयार होतो. त्या तेजीच्या लाटेत जास्तीत जास्त नफा मिळवण्याच्या लोभापायी, मार्केटमधील तेजी कायम राहील असं वाटून अनेक गुंतवणूकदार अनावश्यक खरेदी करतात.

परिणाम : जास्तीत जास्त फायदा मिळवण्यासाठी अवास्तव किंमत असलेल्या स्टॉकमध्ये अशा वेळी गुंतवणूक केली जाते. या गुंतवणुकीत रिस्क जास्त असते आणि दुसरं म्हणजे त्यातून गुंतवणूक डायव्हर्सिफाय होत नाही. आपल्याकडे असलेल्या स्टॉक्सच्या किमती वाढत असतात तेव्हा त्या आणखी वाढतील या आशेने गुंतवणूकदार ते स्टॉक्स योग्य वेळी विकत नाहीत आणि अखेर ते स्टॉक्स कोसळतात.



उपाय: वास्तवाचा विचार करून तुमचं ध्येय ठरवल्यास आणि गुंतवणूक करताना आर्थिक शिस्त पाळल्यास लोभापासून दूर राहणं शक्य आहे. स्टॉक मार्केटमधील चढउतारांचं चक्र असतं तेही समजून घेतलं पाहिजे.

२. समूहातून दूर फेकले जाण्याची भीती

इतर लोक चांगला नफा कमवत असताना आपण त्या नफा कमावणाऱ्यांमध्ये नसू ही भीती.

प्रसंग : आपले मित्र, नातेवाईक, शेजारी अनेकदा स्टॉक्स किंवा म्युच्युअल फंडमधून त्यांना कसा भरपूर नफा झाला याबद्दल बोलत असतात. ते ऐकताना आपणही त्यांच्यासारखा नफा कमवायला हवं असं आपल्याला वाटू लागतं. भारताच्या संदर्भात बँकिंग आणि फायनान्स क्षेत्रात आलेली तेजी, किंवा इतर काही क्षेत्रात अचानक तयार झालेली तेजी अशा खरेदीला कारणीभूत ठरू शकते.

परिणाम : समूहापासून दूर फेकले जाण्याच्या भीतीमुळे लोक भावनेच्या भरात निर्णय घेतात. शेअरचा भाव जास्त असताना ही खरेदी केली जाते आणि तो भाव जेव्हा उतरतो तेव्हा त्या शेअरची खरी किंमत कळते.

उपाय : कोणत्याही ऐकीव माहितीवर, सोशल मीडियातील विश्वासार्ह नसलेल्या माहितीवर अवलंबून राहून घाईने निर्णय घेण्याच्या ऐवजी खरेदी - विक्री करताना मुळातून अभ्यास करण्याची गरज असते. जोखीम, मूल्यांकन, एखादा स्टॉक अचानक का चालतोय याचा आणि मार्केटच्या बेसिक तत्त्वांचा अभ्यास करा.

३. परताव्याची तुलना करण्याची सवय

गुंतवणूक केल्यानंतर त्यातून आपल्याला किती परतावा मिळाला, आणि इतरांना किती परतावा मिळतोय याची सतत तुलना करण्याची सवय

प्रसंग: भारतात कुटुंब किंवा नातेवाईक जेव्हा एकत्र येतात तेव्हा स्टॉक मार्केट, म्युच्युअल फंडमधील गुंतवणुकीबद्दल आणि आपल्या पोर्टफोलिओबद्दल चर्चा करणं आता सामान्य झालं आहे. या चर्चेतून नातेवाईक आपल्यापेक्षा जास्त परतावा मिळवत आहेत असं कळतं तेव्हा नकळत तुलना सुरू होते आणि त्यातून स्वतःबद्दल संशय तयार होतो. यातूनच पुढे चुकीचे निर्णयही घेतले जातात.


परिणाम: सतत तुलना करण्याच्या सवयीमुळे आपण स्वतःच ठरवलेल्या आर्थिक उद्दिष्टांकडे दुर्लक्ष होतं. तुलनेच्या आधारावर घेतलेल्या निर्णयांमुळे अनेकदा पोर्टफोलिओचं मूल्यही कमी होतं.

उपाय : गुंतवणुकीची उद्दिष्ट्ये वैयक्तिक असतात हे लक्षात घ्या. प्रत्येक व्यक्तीची जोखीम घेण्याची क्षमता, आर्थिक परिस्थिती, भविष्यातील ध्येय इत्यादी गोष्टींवर गुंतवणूक अवलंबून असते. त्यामुळे इतर लोक काय करतात याला फार महत्त्व न देता तुम्ही केलेल्या नियोजनानुसारच निर्णय घ्या. तात्पुरत्या तेजीला भुलून निर्णय घेण्याची सवय : दीर्घकालीन धोरण बाजूला ठेवून तात्पुरत्या वाढलेल्या किमती पाहून निर्णय घेणं गरजेचे आहे.

– किरांग गांधी.

जन्म हा अखेरचा

# अंतरात्मस्थल



काल आपण अंतरात्मस्थलाचा विचार केला. घरट्यात राहणारा पक्षी जसा घरट्यापासून वेगळा असतो तसा देहात राहणारा अंतरात्मा देहापासून अलिप्त असतो. एक पक्षी घरट्यात राहतो तर दुसरा पिंजऱ्यात. कोणीतरी त्याला मनोविनोदनासाठी पिंजऱ्यात बंदिस्त करुन ठेवलेले असते. घरट्यातला पक्षी स्व-तंत्र असतो तर पिंजऱ्यातला पक्षी पर-तंत्र असतो. त्याला वेळच्या वेळी पाणी मिळते, डाळ मिळते. परंतु शेवटी तो असतो कैदीच. पिंजऱ्यात राहून राहून तो उडणे देखील विसरुन गेलेला असतो. त्याला कोणी पिंजऱ्याबाहेर काढले तर तो घाबरुन पुन्हा पिंजऱ्यात जाऊन बसतो. संसारी माणसाची अवस्था पिंजऱ्यातल्या पक्ष्यासारखीच असते. त्याला कोठेही नेले तरी घाईघाईने तो संसारात परत येतो. परंतु अंतरात्म्यासाठी उदाहरण दिले आहे ते घरट्यात राहणाऱ्या स्वतंत्र पक्ष्याचे. मनात आले तर घरट्यात राहील, मनात आले तर निळ्या अंतराळात, स्वच्छंद विहार करील. त्याच्या घरट्याला दार नसते. अशी स्थिती अंतरात्म्याची असते. वासनेमुळे तो कधी देहभानावर असतो तर कधी देहभाव हरवून आत्मचिंतनात मग्न होतो. यापुढील स्थल आहे परमात्मस्थल. **निर्धूते तत्प्रबोधेन मले संसारकारणे ।**

**सामरस्यात् परात्मस्थात् परमात्मायमुच्यते ।।**

**(श्री सिद्धांतशिखामणी - १८.२९)** मल हे संसाराचे कारण असतात. अंतरात्मस्थलातील साधक ज्ञानप्राप्तीमुळे मलांपासून मुक्त होतो आणि परमात्म्याशी समरसभाव साधल्यामुळे 'परमात्मा' म्हणवला जातो. अंतरात्मस्थलातील साधक तसाच निवांत राहत नाही तर समरसभावाने परमात्म्याचे चिंतन करतो. परम म्हणजे श्रेष्ठ. परमात्मा याचा अर्थ सर्वश्रेष्ठ तत्त्व. आत्मा हा मुळात परमात्माच असतो. तो अज्ञानामुळे आपले व्यापक स्वरुप विसरुन स्वत:ला जीवात्मा समजू लागतो. **(क्रमश:) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

जनमानस

# रोमँटिक हिरो शशी कपूर

४ डिसेंबर हा हिंदी चित्रपटसृष्टीचे अभिनेते शशीकपूर यांचा सहावा स्मृतिदिन. ते प्रसिद्ध चित्रपट निर्माता-दिग्दर्शक पृथ्वीराज कपूर यांचे सुपुत्र होते. त्यांचे मूळ नाव बलबीर राज कपूर होते, तथापि त्यांचे कुटुंबीय त्यांना प्रेमाने शशी म्हणत.



१८ मार्च १९३८ रोजी कोलकाता येथे जन्मलेल्या शशीकपूर यांना लहानपणापासूनच अभिनयाची आवड होती आणि त्यांचा हा छंद पुढे करिअर बनला. त्यांनी संग्राम (१९५०) आणि दाना पानी (१९५३) सारख्या चित्रपटांमध्ये शशिराज नावाने काम केले. बालकलाकार म्हणून त्यांची सर्वात यशस्वी कामगिरी राजकपूर दिग्दर्शित आग (१९४८) आणि आवारा (१९५१) या चित्रपटांमध्ये होती, ज्यात त्यांनी नायकाची बालपणीची भूमिका केली होती. शशीकपूर यांनी १९६१ मध्ये यश चोप्रा यांच्या 'धर्मपुत्र' या चित्रपटातून नायक म्हणून सिने करिअरला सुरुवात केली आणि तेव्हापासून त्यांनी सुमारे १६० चित्रपट केले असून, त्यापैकी ६१ चित्रपटांमध्ये त्यांनी मुख्य नायक, ५५ चित्रपटांमध्ये सहनायक होता.

१९५८ मध्ये त्यांचा जेनीफर केंडल या ब्रिटिश अभिनेत्रीशी प्रेमविवाह झाला. त्यांना कुणाल कपूर, करण कपूर ही दोन मुले आणि संजना कपूर ही मुलगी अशी तीन अपत्ये आहेत. नोव्हेंबर १९७८ मध्ये जेनिफर आणि शशी यांनी मुंबईत पृथ्वी थिएटरची स्थापना केली. वडील पृथ्वीराज कपूर आणि बंधू राज कपूर यांच्यानंतर दादासाहेब फाळके पुरस्कार मिळवणारे कपूर कुटुंबातील तिसरे सदस्य असणाऱ्या शशीकपूर यांना २०१० मध्ये फिल्म फेअर लाईफ टाईम अचिव्हमेंट पुरस्कार, २०११ मध्ये पद्मभूषण आणि काही चित्रपटांसाठी राष्ट्रीय पुरस्कार मिळाले. दीर्घकाळ आजारी असलेल्या शशीकपूर यांचे ४ डिसेंबर २०१७ रोजी मुंबईतील कोकिलाबेन रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले होते. त्यांच्या सहाव्या स्मृतिदिनानिमित्त त्यांना विनम्र आदरांजली.

**– प्रा. विजय कोष्टी, जि. सांगली.**



# - संतविचार -

डॉ. देविदास गुरव, सोलापूर

# 'लहानपण दे गा देवा'

**लहानपण दे गा देवा । मुंगी साखरेचा रवा ।।**
**एरावत रत्न थोर । त्यासी अंकुशाचा मार ।**
**ज्याचे अंगी मोठेपण ।। तया यातना कठीण ।**
**तुका म्हणे जाण ।। व्हावे लहानाहूनी लहान ।**

संत तुकोबा विनंती करतात की, हे! देवा! भगवंता! या सृष्टीत जो लहान जीव आहे, त्याच्यापेक्षाही मला 'लहानपण'(विनम्रता) दे! म्हणजेच कमीपणा दे! कारण मुंगी आकारानेही लहान असून तिच्या अस्तित्वाची कोणी दखल घेत नाही. ती येथे सुखी असून तिला रोज साखरेचा रवा मिळतो. परंतु 'ऐरावत हत्ती' (मोठेपणा) जो समुद्र मंथनातून बाहेर पडलेल्या चौदा रत्नांपैकी एक आहे, त्याचे थोरपण पाहून इंद्राने त्याला स्वतःसाठी मागून घेतले आणि स्वतःचे वाहन बनवले. परंतु ऐरावताच्या वाट्याला रोज माहूत्याचा (त्याच्यावर अंकुश ठेवणाऱ्याचा) मारच येऊ लागला. तो रोज निमूटपणे सहन करू लागतो. स्वतःचे मोठेपण, थोरपण मिरवतो आणि लोकांच्या नजरेत भरून यावे, अशी मनी इच्छा बाळगतो पण फायदा होण्याऐवजी नुकसानच अधिक होते. तेथूनच यातनेचा आरंभ होतो. ज्या 'वाहवा'साठी मोठेपणाची अभिलाषा धरली त्याच्या पदरी कष्टच अधिक पडले. याउलट जो विनयशील राहातो, स्वतःला लहानाहूनि लहान समजतो, लीन होतो, त्याच्या नशिबी मात्र आगळेच 'सुख' येते. तुकाराम महाराज शेवटी म्हणतात की, 'लहाणपणाचे' हे वर्म आता सर्वार्थाने लक्षात घ्या, हे रहस्य, हे गुपित जाणून घेऊन जेवढे लहान होता येईल तितके 'लहान' व्हा! कारण जे 'सर्वोत्तम' तेच तुम्हाला प्राप्त होईल. मुंगी साखरेचा कण खाते नि, बलाढ्य हत्तीला मात्र, अंकुशाचा मार खावा लागतो.'जया अंगी मोठेपण तया यातना कठीण', या उद्गारातून संत तुकारामांनी व्यवहारात आपण धनवान असो वा नसो अंगी नम्रता असणे गरजेचे असते. आज समाजात धनवान व खूप श्रीमंत लोक आहेत. पण त्यांना त्यांच्या जवळील असलेल्या संपत्तीचाच जास्त त्रास होतो, केवळ पैशावरून, मोठेपणाच्या हव्यासातून कुटुंबात कलह होतात, नातेसंबधात कटूता येते, शत्रुत्व निर्माण होते. तर कधी चोर, दरोडेखोर संपत्तीवर डल्ला मारतात. जे मोठेपणाच्या बळावर हाती सत्ता मिळवतात, त्याचा त्यांनाच त्रास होतो. माणूस लौकिकाने जेवढा मोठा तेवढा त्याला 'गर्व' जास्त असतो. माणूस जेवढा मोठा तेवढ्या त्याच्या संवेदना बोथट होत असतात.



थोडक्यात सर्वच क्षेत्रात वावरताना 'लहाणपण' स्वीकारता आले पाहिजे. अध्यात्म किंवा परमार्थामध्ये विनयशीलतेशिवाय पर्यायच नसतो. बालपणी नम्र, निर्मळ, निरागस, निरपेक्ष असते. आचार-विचारात एकवाक्यता असते. मनात कुणाविषयी आकस नसतो, मोठेपणी मात्र याच्या उलटे होते. म्हणूनच तुकोबांनी देवाकडे लहानपण मागितले आहे. 'लहाणपण' या शब्दात बराच मोठा अर्थ दडला आहे. भक्ती पथावरून वाटचाल करतांना 'लहानपण'आवश्यकच आहे. संतांच्या वाणीत याचे मर्म आले आहेच, समजून घेण्याकरिता 'लहान' व्हावे लागते हे मात्र निश्चित.

***

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

## संक्षिप्त वृत्त

### शहर हद्दीतून चोरट्याने पळवल्या दोन दुचाकी

**सोलापूर :** शहर हद्दीतून विविध ठिकाणाहून चोरट्याने दोन मोटारसायक पळविल्या. पहिल्या घटनेत राहत्या घरासमोर पार्क करून ठेवलेली दुचाकी (एम.एच.१३.सी.जी.७६२१) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना कर्णिकनगर येथे घडली. याप्रकरणी शरदकुमार दत्तात्रय एकबोटे (वय-४५, कर्णिकनगर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाल.तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल पाटील हे करीत आहेत.

दुसरी घटना ही जेलरोड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कन्ना चौक येथील एसबीआय बँकेसमोर घडली. फिर्यादी कुमारस्वामी देविदास पंडल (वय-३३, इंद्रावसाहत, भवानी पेठ) यांची दुचाकी (एम.एच.१३.ए.वी.३९२०) ही हँडल लॉक करून ठेवलेली असताना अज्ञात चोरट्याने चोरून नेली. याप्रकरणी पंडल यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला.तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल राठोड हे करीत आहेत.

### पैशाच्या व्यवहारातून हॉकी स्टीकने मारहाण

**सोलापूर :** पैशाच्या व्यवहारातून हॉकी स्टीक, क्रिकेटच्या स्टंपाने गंभीररित्या मारहाण करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध विजयपूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. ही घटना अशोकनगर, विजयपूर रोड येथील स्क्रॅप दुकानात घडली. याप्रकरणी रोहन संतोष पुजारी (वय-२२, गणेशनगर, विजयपूर रोड) यांनी विजयपूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.त्यांच्या फिर्यादीवरून राज जाधव (सेटलमेंट) आणि त्याचे इतर तीन साथीदार यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला. फिर्यादी हे अशोकनगर येथील त्यांच्या स्क्रॅपच्या दुकानात बसलेले असताना चार इसम हे दुकानात येऊन पैशाच्या व्यवहारातून फिर्यादींना तुला खूप मस्ती आली आहे.थांब तुला जीवे ठार मारून टाकतो, असे म्हणून राज जाधवने त्याच्या हातातील लोखंडी सळई फिर्यादीच्या डोक्यात मारली.त्यावेळी फिर्यादींना भोवळ आल्याने ते खाली जमिनीवर पडले. त्यानंतरदेखील वरील संशयित आरोपींनी हातामध्ये असलेले हॉकी स्टीक व क्रिकेटच्या स्टंपने हातावर व डोक्यावर गंभीररित्या मारून जखमी करीत जीवे मारण्याचा प्रयत्न केला.असे फिर्यादीत नमूद आहे. तपास पोसई गायकवाड हे करीत आहेत.

# स्वामी सेवेतून अक्कलकोटचा विकास हेच ध्येय

## -मालोजीराजे भोसले यांचे प्रतिपादन

सुराज्य/अक्कलकोट

श्री स्वामी समर्थांच्या सेवा कार्यातून अक्कलकोटचा विकास साधणे हेच माझे ध्येय आहे, असे प्रतिपादन अक्कलकोट संस्थानचे नरेश श्रीमंत मालोजीराजे भोसले यांनी केले. ते श्री स्वामी समर्थ दिव्यदर्शन प्रकल्प सादरीकरणप्रसंगी बोलत होते.



अक्कलकोट : नवीन राजवाडा प्रांगणात श्री स्वामी समर्थ दिव्यदर्शन प्रकल्पाच्या सादरीकरणप्रसंगी श्रीमंत मालोजीराजे भोसले, वृषालीराजे भोसले,जयप्रभादेवीराजे भोसले, अशोक कुलकर्णी आदी.

नवीन राजवाडा प्रांगणात राजेशाही थाटात हा कार्यक्रम झाला. यावेळी श्रीमंत छत्रपती वृषालीराजे शिवाजीराजे भोसले (सातारा), सिने अभिनेते अशोक कुलकर्णी, श्रीमंत गोपाळराजे पटवर्धन (मिरज), श्रीमंत नंदिताराजे घाटगे (कागल), श्रीमंत पद्मजाराजे पटवर्धन (मिरज), ॲड. सयाजीराजे भोसले, ॲड. जयाजीराजे भोसले, जयहिंद शुगर चेअरमन गणेश माने- देशमुख, जयप्रभादेवीराजे भोसले, सत्यशील ढमाले, मधुवंती ढमाले, सभापती संभाजी इंदलकर (सातारा), उद्योगपती श्रीधर कंगराळकर, आशीष कदम, मल्लिनाथ साखरे, मल्लम्मा पसारे, सोनल जाजू, शिवाजीराव पाटील, डॉ.सतीश कदम, मुकुंद घाटगे, मारूती बावडे, जयसिंह पाटील, जितेंद्र जाजू, लक्ष्मण रामपुरे, डॉ. विपुल शहा, स्वामीराज रामदे, रोहन जिरोळे, अनिल जाविया, सिद्धार्थ बिंदगे उपस्थित होते.

याप्रसंगी बाबासाहेब निंबाळकर, श्रीमंत गोपाळदेव पटवर्धन, भगवान रामपुरे, महेश नामपुरकर यांनी मनोगत व्यक्त केले. अनुभूती या पुस्तकाचे प्रकाशन, अक्कलकोट राजघराण्याचा इतिहास संकेतस्थळाचे उद्घाटन केले. सूत्रसंचालन धनश्री दामले यांनी केले.

### स्वामींची १०८ फूट उंचीची मूर्ती स्थापणार

राजघराण्याच्या राम तलाव या निसर्गरम्य परिसरात ३५ एकरात हा प्रकल्प साकारला जाणार असून, या ठिकाणी १०८ फूट उंचीची श्री स्वामी समर्थांची मूर्ती स्थापना केली जाणार आहे.

### भगवान रामपुरे यांना झाला दृष्टांत

श्रीमंत मालोजीराजे भोसले म्हणाले, विख्यात शिल्पकार भगवान रामपुरे यांना श्री स्वामी समर्थांचा दृष्टांत झाला. तो दृष्टांत स्वामी नगरी अक्कलकोटमध्ये भव्य अशी स्वामींची मुर्ती साकारली जाणार आहे. यासाठी सर्व स्वामी भक्तांनी सहकार्य करावे, असे आवाहन श्रीमंत मालोजीराजे भोसले यांनी केले.

# वेळापूर इंग्लिश स्कूलची अनुष्का पवार उत्कृष्ट आक्रमक पुरस्काराने सन्मानित

सुराज्य/वेळापूर

पालघर येथे झालेल्या ३८ व्या किशोर, किशोरी राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेत वेळापूरच्या इंग्लिश स्कूलची विद्यार्थिनी व अर्धनारी नटेश्वर क्रीडामंडळाची सदस्या, उत्कृष्ट खेळाडू आणि किशोरी सोलापूर संघाची कर्णधार अनुष्का विनोद पवारला स्पर्धेतील उत्कृष्ट आक्रमक खेळाडू या पुरस्काराने सन्मानित केले.

अन्वयी लक्ष्मण मंडले, वैष्णवी जनार्धन कुदळे यांनी उत्कृष्ट खेळी करीत सोलापूर संघाला महाराष्ट्र राज्यात प्रथम क्रमांक मिळवून दिला. त्यांना प्रशिक्षक महेश चव्हाण, सुनील चव्हाण, संघ व्यवस्थापक सतीश राठोड, सोनाली शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे जिल्हा नियोजन समितीचे माजी सदस्य, अकलूज मार्केट कमिटीचे संचालक उत्तमराव जानकर, डॉ. चंद्रजीत जाधव, क्रीडा अधिकारी सत्येन जाधव, क्रीडा अधिकारी सुप्रिया गाढवे, अकलूज मार्केट कमिटीचे माजी संचालक दादासाहेब घाडगे, वेळापूर सरपंच रजनीश बनसोडे, उपसरपंच नानासाहेब मुंगुसकर, माजी जि. प. सदस्य बाळासाहेब धाईंजे, सामाजिक न्याय विभाग जिल्हाध्यक्ष प्रा. धनंजय साठे, पोलीस शहाजी मंडले, आरपीआय आठवले गटाचे तालुकाध्यक्ष मिलिंद सरतापे, शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष संजय देशपांडे, गटनेते संजयआबा मंडले, लखन मंडले, राष्ट्रीय प्रशिक्षक सोमनाथ बनसोडे, मुख्य क्रीडा शिक्षक सतीश कदम, शिवाजी जाधव, श्रीनाथ खटके, बंटी जाधव, इंग्लिश स्कूल संस्थेचे अध्यक्ष ॲड. सुजीत कदम, सचिवा प्रियदर्शनी महाडिक कदम, आधारस्तंभ डॉ. सुभाष कदम, संस्थेच्या मार्गदर्शिका डॉ. मीनाताई कदम, संचालिका तेजस्विनी कदम, स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन प्रतापराव पाटील, प्राचार्य आर.बी. पवार, उपमुख्याध्यापक सुनील खंदारे, पर्यवेक्षक पठाण, शिवशरण, शिक्षक पालक संघ महिला उपाध्यक्षा



स्मिता पिसे, कोषाध्यक्ष दत्तात्रय काटे, सहसचिव सत्यवान पिसे आदींनी अभिनंदन केले आहे.

# लवकरच प्रादेशिक परिवहन कार्यालय फलटणला सुरु होणार

## खा. रणजीतसिंह नाईक-निंबाळकर

**सोलापूर :** लवकरच प्रादेशिक परिवहन कार्यालय फलटणला सुरु होणार असल्याचे खा. रणजीतसिंह नाईक-निंबाळकर यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये सांगितले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन फलटण येथे परिवहन कार्यालय सुरू व्हावे, अशी मागणी खा.रणजीतसिंह नाईक-निंबाळकर यांनी केली. याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विशेष बाब म्हणून परवानगी देण्यात यावी, असे आदेश संबंधित विभागास दिलेले आहेत. फलटण येथे परिवहन कार्यालय सुरू झाल्यास फलटणमधील सर्वसामान्य लोकांना लायसन्ससह अन्य कामासाठी साताऱ्याला जावे लागणार नाही. सध्या आरटीओ कामासाठी सातारा येथे जावे लागत आहे. फलटणच्या शेवटच्या टोकापासून हे अंतर कमीत कमी १०० किलोमीटर आहे. त्यामुळे नागरिकांचे खूप हाल होत आहेत. त्यांना आर्थिक त्रास सोसावा लागत आहे. फलटणला परिवहन कार्यालय झाल्यास फलटणमधील सर्वसामान्य लोकांना याची सोय होणार आहे. त्यामुळे शहरातील युवक, व्यापारी यांचाही दिवस वाया जाणार नाही. खर्चामध्येही कपात होईल. त्यांचा वेळही वाचणार आहे. स्वतंत्र आरटीओ नंबरदेखील फलटण तालुक्याला मिळेल, असे खा. निंबाळकर यांनी म्हटले आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिलेल्या पत्रामध्ये आरटीओ कार्यालयास सरकारी जागा उपलब्ध व्हावी, अशी मागणीही खा. निंबाळकर यांनी केली आहे. त्या मागणीलाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिसाद दिला आहे. त्यामुळे लवकरच प्रादेशिक परिवहन कार्यालय सुरू होण्यास अडचण राहणार नाही, असे खा. निंबाळकर म्हणाले.


# वडजीतील कुंभार बंधूंचा तीन एकर कांदा पाण्यात

सुराज्य/दक्षिण सोलापूर

वडजी (दक्षिण सोलापूर) तालुक्यातील कुंभार बंधूच्या तीन एकर क्षेत्रात नुकत्याच झालेल्या पावसाचे पाणी शिरले. या अवकाळी पावसाने कुंभार बंधूच्या तीन एकरातील उभे कांद्याचे पीक पाण्यात वाहून गेले.

दरम्यान, या अवकाळी पावसामुळे कुंभार कुटुंबियांचे जवळपास अडीच ते तीन लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. तत्काळ शासनाने पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी सिद्धाराम कुंभार यांनी दैनिक सुराज्यच्या प्रतिनिधींची बोलताना केली आहे.

वडजीतील कुंभार यांच्या शेतात अवकाळी पावसाने गुडघेभर पाणी साचले होते. प्रकाश कुंभार, दयानंद कुंभार आणि सिद्धाराम कुंभार यांनी आपल्या शेतात तीन



एकर कांद्याची लागवड केली होती. दरम्यान कांदा कापणीला आला होता. तो कांदा शेतात ठेवलेला होता.

दरम्यान, अवकाळी पावसाने त्यांच्या कांदा शेतात पाणी शिरले त्यामुळे हाताला आलेला कांदा पीक पाण्यात पाहून गेल्याने कुंभार कुटुंबियांवर आर्थिक संकट कोसळले.

कुंभार बंधुंनी एकरी कांद्यासाठी जवळपास साठ ते सत्तर हजार रुपये खर्च केले होते. प्रकाश कुंभार यांनी यापूर्वी दोनदा कांद्याची लागवड केली. मात्र कांद्याची रोपे उगवली नाहीत. त्यामुळे त्यांनी तिसऱ्यांदा खर्च करून कांदा लागवड केली होती. तेही पाण्यात बुडाले. एकीकडे व्याजाने पैसे लागून कांदे लावले, दुसरीकडे पाण्याने वाहून नेले, त्यामुळे करावे काय, असा सवालही कुंभार यांनी केला आहे.

# तलाठ्याचा 'सज्ञा' तालुक्यात; ग्रामस्थ,शेतकरी हेलपाट्याने त्रस्त

**▶▶ सांगोला तालुक्यातील कार्यालये तलाठीविना ओस ▶▶ तलाठी, कोतवाल यांच्या मनमानीमुळे भुर्दंड**

सुराज्य/सांगोला

गेल्या काही दिवसांपासून तालुक्यातील तलाठी आपल्या सज्जाचा कारभार तालुक्याच्या ठिकाणावरून हाकत आहेत. परिणामी गावातील ज्या ठिकाणी तलाठी कार्यालय आहेत, त्या ठिकाणी तलाठी हजर राहत नसल्याने कार्यालय शोभेची वस्तू बनली आहेत. त्यामुळे तलाठी, कोतवाल यांच्या मनमानी कारभारामुळे ग्रामस्थ, विद्यार्थ्यांना वेळ आणि पैशाचा भुर्दंड सहन करावा लागत आहे.

शासनाने ग्रामीण भागातील नागरिकांचे नुकसान टाळण्यासाठी लाखो रुपये खर्च करून तलाठी कार्यालय गावोगावी निर्माण केले. सांगोला तालुक्यातील बहुतांश ठिकाणी तलाठी कार्यालये आहेत. मात्र तलाठी हे कार्यालयात बसून, कारभार पाहत नसल्याचे ती ओस पडल्याचे दिसून येत आहे. तलाठी हे मुख्यालयी राहण्याच्या आदेशाला डावलत असल्याचे चित्र सांगोला तालुक्यात निर्माण झाले आहे.

शेतकऱ्यांना शेती आणि इतर विविध कामांसाठी तलाठी कार्यालयातून सातबारासारखी काही विविध कागदपत्रे विविध कामांसाठी लागतात. शालेय विद्यार्थी, नोकरदारांना लागणारे जात प्रमाणपत्र, रहिवासी कुटुंब प्रमाणपत्र आदी प्रमाणपत्रे आणि अन्य महत्त्वाची कागदपत्रे मिळविण्यासाठी ग्रामीण भागातील संबंधित शेतकरीवर्ग सकाळपासूनच तलाठ्याच्या शोधात असतात. आज इथे तर उद्या तिथे अशा प्रकारे तलाठी ग्रामस्थांच्या समस्येकडे दुर्लक्ष करीत आहेत. अनेक तलाठी तर मोबाईलदेखील बंद ठेवतात. कोतवालदेखील ग्रामस्थांना याबाबत योग्य माहिती देत नाहीत. परिणामी तलाठी, कोतवाल यांच्या मनमानी कारभारामुळे ग्रामस्थांसह व विद्यार्थ्यांना वेळ व पैशाचा भुर्दंड सहन करावा लागत आहे. सांगोला तालुक्यातील अनेक गावांमध्ये खाजगी ऑपरेटरच कोतवाल, तलाठ्याचे काम करताना दिसत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांसह विद्यार्थ्यांना विविध कागदपत्रांसाठी लागणारी स्वाक्षरी व कागदपत्रे घेण्यासाठी तालुक्याला यावे लागत आहे.

विद्यार्थी, शेतकऱ्यांना गावातच कागदपत्रे उपलब्ध करून द्यावीत. त्यांची होणारी पायपीट थांबवावी. संबंधितांना तहसीलदार यांनीच आता समज द्यावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

# अखेर सांगवी पुलाच्या दुभाजकाला पडलेले भगदाड बुजविण्याचे काम सुरु

सुराज्य सोलापूर Impact

सुराज्य/अक्कलकोट

अक्कलकोट-वागदरी रस्त्यावर डांबर उखडून खड्डे पडल्याने वाहनचालकांना याचा नाहक त्रास होत होता. याच विषयाला अनुसरून दैनिक सुराज्यमध्ये शुक्रवार, दि. २ डिसेंबर रोजीच्या अंकात 'सांगवी बु. पुलाच्या दुभाजकाला भगदाड' या मथळ्याखाली बातमी प्रसिद्ध झाली होती. दरम्यान, राष्ट्रीय महामार्ग विभाग खडबडून जागे झाले आणि तत्काळ सांगवी पुलाच्या दुभाजकाला पडलेले भगदाड बुजविण्याच्या कामाला सुरुवात झाली.

विशेष धक्कादायक बाबा म्हणजे सांगवी बु. येथील पुलाच्या दुभाजकाला भला मोठा भगदाड पडला आहे. हा पूल संपताच रस्त्याच्या दोन्ही बाजूला भले मोठे खड्डे पडलेले आहेत. त्यामुळे लांबून येणाऱ्या वाहन चालकाच्या निदर्शनास येत नाहीत. पण गाडीजवळ जाताच हे खड्डे दिसतात. अचानकपणे गाडी कंट्रोल करणे हे वाहन चालकांना धोक्याचे ठरत आहे. दोन दिवसांपूर्वी दुचाकीस्वारला हा खडा न दिसल्याने गाडी खड्ड्यात गेली. दुचाकीवरील दोघेही खड्ड्यात पडले. त्यामध्ये निमगाव येथील रहिवासी बियामा चाँद शेख (वय-५३) या गंभीर जमखी होऊन उपचारादरम्यान मयत झाल्या.



### टेंडरला उशिरा परवानगी मिळाली

अक्कलकोट-वागदरी या रस्त्याच्या टेंडरच्या कामाला केंद्रामधून लवकर परवानगी न मिळाल्याने कामाला उशीर झाला आहे. आता सध्या खड्डे बुजवण्याचे काम चालू असून, येत्या आठवड्यात भरात पेव्हिंगसह रस्त्याचे काम पूर्ण होईल.

**-किरण हबीब, शाखा अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, सोलापूर.**

अक्कलकोट-वागदरी हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत होता. पण गेल्या ५ ते ६ वर्षांपासून हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग विभागाच्याकडे हस्तांतरीत केला आहे. या विभागाचे ठेकेदार व अधिकाऱ्यांनी या गंभीर बाबीकडे डोळेझाक करीत होते. पण दोन दिवसांपासून सतत बातम्या झळकल्या. महामार्ग खाते तत्काळ कामाला लागले. येत्या आठवड्याभरात (पेव्ह) पेव्हिंग बसविण्याचे पण काम पूर्ण होणार असल्याची माहिती राष्ट्रीय महामार्गच्या अधिकाऱ्यांनी सांगितले अक्कलकोट-वागदरी राष्ट्रीय राज्य महामार्ग हा रस्ता कर्नाटक, मराठवाड्याला जोडणारा अत्यंत महत्त्वाचा रस्ता समजला जातो.

या रस्त्यावर सर्वात जास्त रहदारी असते. या सांगवी बु. पुलाजवळ पडलेल्या मोठ्या खड्ड्यात आापर्यंत ३० ते ४० जण पडून गंभीर जखमी झाले आहेत. त्यातच एका महिलेचे मृत्यूही झाला आहे.


**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**

**सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर**

**सात रस्ता, कारीगर पेट्रोल पंपासमोर, सोलापूर ४१३ ००३**

**ई-निविदा सुचना क्रमांक ४५ सन २०२३-२४ (ऑनलाईन)**

**''बी - २ निविदा''**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर-४१३००३ निविदा पत्रात नमुद केलेले पात्रतेचे निकष पुर्ण करीत व सा.बां.विभागाकडून नोंदणीकृत असलेल्या कंत्राटदार यांचेकडून खालील कामाकरिता ''**बी-२**'' नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहोत. निविदा कागदोपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर ४१३००३ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्रं. | कामाचे नाव | निविदेचा प्रकार | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु. | ठेकेदाराचा अधीकृत वर्ग |
|---|---|---|---|---|
| १ | सोलापूर जिल्ह्याच्या ठिकाणी अतिरिक्त जिल्हा न्यायालयाची इमारत (बेसमेंट+तळमजला+८ मजले) (२५ कोर्ट हॉल) व स्काय वॉक बांधणेबाबत | बी-२ निविदा | ७९,६२,१८,९८८/- (इलेक्ट्रीक कामासह) | सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणी अनिवार्य नाही |

| | | |
|---|---|---|
| ई-निविदा उपलब्ध कालावधी | :- | दि. ०४/१२/२०२३ (वेळ सकाळी १०.०० वा. पासून) ते २९/१२/२०२३ (सायं. १८.१५ पर्यंत) |
| निविदा पूर्व बैठक | :- | **निविदा पूर्व बैठक १९/१२/२०२३** मा. मुख्य अभियंता., सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नविन मध्यवर्ती इमारत पुणे-१ यांचे कार्यालयात १२.०० वा., सदर निविदा पूर्व बैठक (online via link generated). |
| तांत्रिक व आर्थिक निविदा सादर करणेचा अखेरचा दिनांक. | :- | दि. २९/१२/२०२३ (सायं. १८.१५ पर्यंत) |
| मुळ दस्तऐवज सादर करण्याचा अंतिम दिनांक (निविदा शर्त ८.१) | :- | ई-निविदा पोर्टलवर ''**बीड लॉक**'' झाल्यानंतर ७२ तासात ''**हार्ड कॉपी**'' १ प्रतीत कंत्राटदारांनी खालील कार्यालयामध्ये सादर करणे अनिवार्य आहे. **१. मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर** |
| निविदा उघडण्याचा कालावधी ठिकाण व वेळ. | :- | **दि. ०४/०१/२०२४** मा. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सोलापूर यांचे कार्यालयात सकाळी ११.०० वाजता. |

निविदा सुचनाबाबतची सविस्तर माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

१). www.mahapwd.gov.in 2) www.mahatenders.gov.in

(सदर निविदेसुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)

३) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर ४१३००३ कार्यालयात सुचना फलक

**सही/-**
**(द.म.गावडे)**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर**

(DGIPR/ROC-5-C 5270)

## संक्षिप्त वृत्त

### सिध्देश्वरच्या एक लाख क्विंटल साखर पोत्याचे उत्पादन पूर्ण

**सोलापूर** :कुमठे येथील श्री सिध्देश्वर सहकारी साखर कारखान्याच्या चालू २०२३-२४ या गळीत हंगामात १ लाख ४५ हजार २१% मेट्रिक टन उसाचे गाळप झाले असून यातून १ लाख क्विंटल साखर उत्पादनाचा टप्पा कारखान्याने पार केल्याची माहिती कारखान्याचे मार्गदर्शक संचालक धर्मराज काडादी यांनी दिली. ऊस गाळप व साखर उत्पादनातील आघाडीबरोबरच कारखान्याच्या सहवीजनिर्मिती प्रकल्पातून यंदाच्या गळीत हंगामात १ कोटी ४८ लाख ३५ हजार ४६८ युनिट विजेचे उत्पादन करण्यात यश आले असून त्यापैकी १ कोटी ५४ हजार ८०० युनिट विजेची निर्यात महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीला करण्यात आली आहे. कारखान्याने यंदाच्या गाळप हंगामात पहिला हप्ता २%०० रुपये व डिसेंबर अखेर येणाऱ्या उसाला २९०० रूपये अंतिम दर तसेच जानेवारीच्या पुढे प्रत्येक महिन्यास प्रति टन शंभर रूपये जास्त दर देण्याचे जाहीर करून सभासद शेतकऱ्यांना जास्तीचा फायदा करून देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे सभासदांनी ऊस गाळपास घालण्यासाठी घाई गडबड न करता काबाडकष्ट करून पिकवलेला परिपक्व संपूर्ण ऊस श्री सिध्देश्वर सहकारी साखर कारखान्यास गाळपास देऊन गाळप हंगाम यशस्वी करावा तसेच २०२१-२२ या हंगामातील प्रतिटन ९० रुपयाप्रमाणे ऊस बिलाचे वाटप सुरू असून सदर हंगामात उसाचा पुरवठा केलेल्या सभासद व बिगर सभासदांनी त्यांचा धनादेश कारखान्याच्या कार्यालयातून घेऊन जाण्याचे आवाहनही काडादी यांनी केले आहे.

### त्रिरत्न बौद्ध महासंघाची उद्या मूकपद यात्रा

**सोलापूर** : त्रिरत्न बौध्द महासंघ सोलापूर केंद्राच्यावतीने बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र आंबेडकर मंगळवार, दि. ५ डिसेंबर रोजी शांती कॅन्डल मार्च (मुकपद यात्रा) काढण्यात येणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमो. हायस्कूलपासून सायंकाळी ७.०० वा. निघणार आहे. डॉ. आंबेडकर पुतळयास पुष्प दिप प्रज्वलीत विनम्र अभिवादन करुन कॅन्डल मार्चचे समारोप होईल. कॅन्डल मार्चचे नेतृत्व पांडूरंग मसलखांब करणार आहेत.

### मंदार परिचारक यांचे यश



**पंढरपूर** : पंढरीतील ज्ञानप्रसाद अॅकॅडमी या क्लासेसचे प्रा. मंदार विनायक परिचारक यांनी एम.एस्ससी. एम.एड. या परीक्षेत आऊट स्टँडिंग या श्रेणीत यश संपादन केले आहे. प्रा. मंदार परिचारक यांच्या या यशाबद्दल पंढरपूर शहरातील विविध मान्यवरांकडून अभिनंदन होत आहे.

# नागरिकांना नागरी सुविधा नाही अन् न.प.कडून करवाढ

## पंढरपूर न.प.च्या करवाढीच्या विरोधात नेते मंडळी एकत्र लवकरच तीव्र आंदोलन करण्याचा इशारा

**सुराज्य/पंढरपूर**

शहरातील नागरीकांना नागरी सुविधा मिळत नाहीत. न.प.तर्फे फक्त १० टक्के कर वाढ केल्याचे सांगण्यात आले आहे. मात्र प्रत्यक्षात काही ठिकाणी २७, ४०, ७०, १०० तर ४०० टक्के कर वाढ झाली आहे. यामुळे शहरातील विविध पक्षाच्या नेते मंडळी व पदाधिकाऱ्यांकडून मुख्याधिकारी डॉ. प्रशांत जाधव यांना घेरावा घालण्यात आला.

पंढरपुरातील सर्व रस्ते खराब आहेत. ारोग्याबाबत सुविधा नाहीत. शिक्षणाचा विषेश कर लावला आहे. पंढरपुरातील शाळा बंद आहे. वृक्ष लागवडीचा कर मात्र वृक्ष लागवडीचे कर आकरण्यात येतो. नागरी सुविधा देत आणि कर वाढविला जातो हा चुकिचा निर्णय आहे. करवाढीला स्थगिती देण्यात यावी. अन्यथा जन आंदोलन करणार असल्याचा इशारा पाटील यांनी दिला आहे. यावेळी साईनाथ अंभगराव, आदित्य फत्तेपूरकर, अरुण कोळी, सुधीर भोसले, सुभाष भोसले, संदिप मांडवे, महादेव धोत्रे, ऋषीकेश भालेराव, धनंजय कोताळकर, नागेश गंगेकर, संजय ननवरे, अॅड.दत्तात्रय पाटील, अभिजीत पाटील, माने, बापू शिंदे, उपस्थित होते.

**दुष्काळ ग्रस्त पंढरपूर तालुक्यात कर वाढ**

पंढरपूर तालुक्याला दुष्काळ ग्रस्त म्हणून जाहीर करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील नागरीकांना कर माफ केला जातो. शिक्षण फी माफ केली जाते, विद्यूत बीलात सवलत दिली जाती. मात्र पंढरपूर शहरात सवलती मिळणे व नागरीकांचे कर माफ होणे गरजेचे असतानाही नगरपरिषदेकडून कर वाढ करण्यात आली आहे. हे योग्य नसल्याचे राष्ट्रवादीचे नेते तथा श्री विठ्ठल कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी सांगितले आहे.



पंढरपूर :नगरपरिषदेच्या करवाढीविरोधात मुख्याधिकाऱ्यांना घेराव घालण्यात आला. त्याप्रसंगी साईनाथ अभंगराव, आदित्य फत्तेपूरकर, अरुण कोळी, सुधीर भोसले आदी.

**नागरीकांपेक्षा आमदारांना त्यांचा पक्ष महत्त्वाचा**

गल्लीपासून दिल्ली पासून विद्यमान आमदरांचे सरकार आहे. परंतु सर्व सामान्य जनतेची पिळवणूक करण्याचे त्यांच्या पक्षाचे धोरण आहे. यामुळे ते ह्याच धोरणाप्रमाणे काम करत आहेत. शहरातील नागरीकांपेक्षा आमदारांना त्यांचा पक्ष महत्त्वाचा आहे, त्यामुळे ते आवाज उठवत नाहीत. परंतु आम्ही आवाज उठवणार असल्याचे राष्ट्रवादीचे नेते तथा श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी सांगितले.

# भाजपाचा तीन राज्यांत विजय; सोलापुरात कार्यकर्त्यांचा जल्लोष

**सुराज्य/सोलापूर**

मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगड या तीन राज्यांतील विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला मिळवलेल्या घवघवीत यशाबद्दल भारतीय जनता पार्टीतर्फे जल्लोष करण्यात आला. माजी पालकमंत्री आ. विजयकुमार देशमुख यांच्या दत्त चौकातील संपर्क कार्यालयासमोर भाजप कार्यकर्त्यांनी रविवारी दुपारी प्रचंड जल्लोष केला.


आगामी काळात होणाऱ्या लोकसभा विधानसभा तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर देशातील मध्य प्रदेश, राजस्थान, तेलंगणा, छत्तीसगड आणि मिझोराम या राज्यातील विधानसभा निवडणुका मागील आठवड्यात झाल्या. मिझोरम वगळता निवडणुकांचे निकाल जाहीर झाले. भाजपला तीन राज्यामध्ये मोठे यश मिळाले आहे.

सोलापूर शहरातील भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी एकत्र येत फटाके उडवून मिठाई वाटली. तसेच ढोल ताशांच्या गजरात फुलांची उधळण करून मोठा जल्लोष केला. पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी नवी पेठ परिसरात पदयात्रा काढून येथील व्यापारी आणि नागरिकांना मिठाई वाटली.भारतमाता की जय, वंदे मातरम, भारतीय जनता पार्टीचा विजय असो, नरेंद्र मोदीजी आगे बढो हम तुम्हारे साथ है अशा घोषणा देत भाजप कार्यकर्त्यांनी दिल्या यावेळी भाजपा शहराध्यक्ष नरेंद्र काळे, भाजयुमो शहराध्यक्ष डॉ. किरण देशमुख, महिला मोर्चा अध्यक्षा विजया वड्डेपल्ली, माजी नगरसेवक, शहर पदाधिकारी, महिला मोर्चा पदाधिकारी व भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गोरगरीब कष्टकरी जनतेसाठी राबवलेल्या विविध योजनांचा हा विजय आहे. विरोधकांनी कितीही इंडिया आघाडी केली तरी जनता ही मोदींच्याच पाठीमागे आहे हे तीन राज्यांतल्या निकालावरून स्पष्ट झाले आहे. जनता भाजपाच्या पाठीशी आहे.

**-आ. विजयकुमार देशमुख**



## युवक काँग्रेसच्या युथ आयकॉन फेस्टिव्हल पोस्टरचे प्रकाशन


**सुराज्य/सोलापूर**

राष्ट्रीय काँग्रेसचे नेत्या सोनियाजी गांधी व अखिल भारतीय काँग्रेस वर्किंग कमिटी सदस्या आ. प्रणिती शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त ५ डिसेंबर ते २८ डिसेंबर २०२३ पर्यंत विविध कार्यक्रम घेण्यात येणाऱ्या सोलापूर शहर युवक काँग्रेसच्या युथ आयकॉन फेस्टिव्हल-२०२३ पोस्टरचे प्रकाशन माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, काँग्रेस शहराध्यक्ष चेतन नरोटे, सुरेश हसापुरे, गणेश डोंगरे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी शिंदे म्हणाले, दरवर्षी युवा प्रेरणा सप्ताह सात दिवसांचा असतो परंतु यावर्षी युवक काँग्रेसने महिनाभरात युथ आयकॉन फेस्टिवलचा आयोजन केले आहे, हे खूप कौतुकास्पद आहे असे ते म्हणाले. यावेळी गणेश डोंगरे, श्रीकांत वाडेकर, प्रवीण जाधव, महेश लोंढे, महेश जोकारे, प्रवक्ता दाऊद नदाफ, शरद गुमटे,विवेक इंगळे,धीरज खंदारे, आकाश जांभळे, युवराज जाधव, प्रतीक शिंगे, चंद्रकांत नाईक, महेंद्र शिंदे, गणेश वाघमारे, श्याम केंगार, अजितकुमार साबळे, मनोहर चकोलेकर उपस्थित होते.

## निधन वृत्त

### गुरूवर्य दत्तात्रय चव्हाण



**टेंभुर्णी** : टेंभुर्णी भूषण ह.भ.प. गुरुवर्य दत्तात्रय पंढरी चव्हाण यांचे रविवार, दि. ३ डिसेंबर रोजी पहाटेच्या सुमारास वृध्दापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ७८ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, तीन विवाहित मुली असा परीवार आहे. टेंभुर्णीतील स्वामी समर्थ परिवाराचे ते जनक होते. जनता विद्यालयाचे सेवानिवृत्त क्रिडा शिक्षक होते. स्वामी समर्थ इंटरप्रायजेसचे मालक आनंद चव्हाण यांचे वडील, बेंबळेतील पत्रकार सिध्देश्वर शिंदे यांचे सासरे होत.

### प्रिन्ससाहेब कादरी पिरजादे



**अक्कलकोट** : येथील हजरत सय्यद चाँदपाशा (सरदार पाशा) ऊर्फ प्रिन्ससाहेब कादरी पिरजादे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ७८ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा. सय्यद अब्दूल रऊफ कादरी पिरजादे, तीन मुली, नातवंडे असा परिवार आहे. सरदारपाशा ऊर्फ प्रिन्स ाहेब यांचे महाराष्ट्र, कर्नाटकात सर्व धर्मीय लाखो भक्त आहेत. त्यांच्याकडे रोज मोठ्या प्रमाणात गर्दी असायची. वेगवेगळ्या सर्व धर्मीय कार्यक्रमात त्यांचा सहभागदेखील असायचा.

### राजशेखर कलशेट्टी



**सोलापूर** : टाकळी (दक्षिण सोलापूर) येथील माजी सरपंच राजशेखर मल्लिकार्जुन कलशेट्टी यांचे अल्प आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ५९ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, मुलगी, सून, नात असा परिवार आहे. ते बाजार समितीचे माजी उपसभापती मल्लिकार्जुन कलशेट्टी यांचे सुपूत्र होत. गेली दहा वर्षे टाकळी ग्रामपंचायतीचे सरपंच होते.

### शांताबाई हंचाटे



**सोलापूर** : जुळे सोलापूर येथील शांताबाई देविदास हंचाटे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. मृत्यूसमयी त्या ८१ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात चार मुले, एक मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### सिद्धाराम सुतार



**अक्कलकोट** : चपळगाव येथील सिद्धाराम शामा सुतार (वय-८० वर्षे) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुली, दोन मुले असा परिवार आहे.

# सांगोल्यातील विविध समस्यांचे नगरपालिकेला निवेदन

**सुराज्य/सांगोला**

सांगोला शहरातील नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. शहरवासीयांच्या समस्यांबाबत पुरोगामी युवक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी नगरपालिकेचे मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी यांना निवेदन दिले आहे.

शेतकरी कामगार पक्षाकडून देण्यात आलेल्या निवेदनामध्ये सांगोला शहरात गेल्या काही दिवसापासून अस्वच्छ व कमी दाबाने पाणीपुरवठा होत आहे. याबाबत नागरिकांना स्वच्छ व नियमित पुरेसा दाबाने पाणीपुरवठा करण्यात यावा. तसेच शहरातील अनेक भागामध्ये गटारींची स्वच्छता नसल्यामुळे डासांचे प्रमाण खूपच वाढलेले आहे. या डासांमुळे शहरात डेंगू, चिकनगुनिया सारख्या आजारांचे रुग्ण सतत वाढत आहेत. यासाठी गटारींची स्वच्छता व नियमित निर्जंतुकीकरण करण्यात यावे. गुंठेवारी नियमितता प्रकरणे गतिमान करण्यात यावीत. शहरातील काही ठिकाणी गवत व झाडे-झुडपे वाढले आहेत. अशा ठिकाणी काही विषारी सर्प आढळून येत आहे. शहरात सर्पदंशाने मृत्यू झालेल्या घटना यापूर्वी घडल्या आहेत. या गोष्टींची दखल घेऊन शहरवासीयांच्या समस्या लवकर दूर कराव्यात असे निवेदन मुख्याधिकारी डॉ सुधीर गवळी यांना देण्यात आले आहे.

यावेळी डॉ. बाबासाहेब देशमुख, अॅड. भारत बनकर, इंजि.रमेश जाधव, सुरेश माळी, राजू मगर, दीपक चोथे, मधुकर कांबळे, औदुंबर सपाटे, रफिक तांबोळी, निहाल तांबोळी, बापू ठोकळे, रफिक इनामदार, अजित गावडे, किशोर बनसोडे, दीपक बनसोडे, रामचंद्र ढोबळे, राजू मदने, बाबासाहेब बनसोडे, नागेश तेली इत्यादी मान्यवर उपस्थित होते.



सांगोला : विविध समस्यांचे मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी यांना निवदेन देताना डॉ. बाबासाहेब देशमुख, अॅड. भारत बनकर, रमेश जाधव, सुरेश माळी आदी.

या मागण्यांचे कार्यवाही लवकरात लवकर व्हावी. शहरवासीयांना स्वच्छ व उच्च दाबाने नियमित पाणीपुरवठा व्हावा व विशेषतः डासामुळे विविध आजारांना नागरिकांना तोंड द्यावी लागत आहेत. गटाऱ्यांची स्वच्छता व निर्जंतुकीकरण करणे सुद्धा महत्त्वाचे आहे. या गोष्टींकडे नगरपालिकेने लक्ष दिले पाहिजेत. अन्यथा या बाबींकडे दुर्लक्ष केल्यास शेतकरी कामगार पक्षातर्फे याबाबत निश्चितपणे आवाज उठविला जाईल असा इशारा डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी दिला आहे.

**तुंबलेली गटार दाखवली मुख्याधिकारी यांना.**

विविध मागण्याचे निवेदन डॉ. बाबासाहेब देशमुख व शेकाप पक्षातील विविध मान्यवरांनी मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी यांना दिले. निवेदन दिल्यानंतर त्यांनी थेट बस स्थानक शेजारील तुंबलेली गटार मुख्याधिकारी डॉक्टर गवळी यांना दाखविली. अशा गटारी तुंबल्या तर शहरात डास कसे वाढणार नाहीत ? शहरातील समस्यांबाबत आपण स्वतः लक्ष घालून समस्या सोडवण्याचा प्रयत्न करावा असेही यावेळी डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी सांगितले.

# युवकांनी मतदार नोंदणी कार्यक्रमात सहभागी व्हावे

## विभागीय आयुक्त सौरभ राव; मतदार नोंदणी शिबीराचे आयोजन

**सुराज्य/सोलापूर**

लोकशाही बळकट करण्यासाठी नवयुवकांची भूमिका महत्वाची असून, मतदान प्रक्रियेत युवकांचा सहभाग वाढणे आवश्यक आहे. जास्तीत जास्त युवकांची मतदार नोंदणी व्हावी यासाठी प्रशासनामार्फत विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते या कार्यक्रमात सहभाग घेऊन मतदार नोंदणी करावी असे आवाहन विभागीय आयुक्त सौरभ राव यांनी केले.

बहुउद्देशीय सभागृह जुने जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर येथे विशेष पुनर्निरिक्षण कार्यक्रमांतर्गत महिला, दिव्यांग व विद्यार्थी मतदार नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपायुक्त पुनम मेहता, अपर जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब कांबळे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निराळे, उपविभागीय अधिकारी सदाशिव पडदुणे तसेच विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



यावेळी विभागीय आयुक्त राव म्हणाले, भारत निवडणूक आयोगामार्फत घेण्यात आलेला विशेष पुनर्निरिक्षण कार्यक्रमांतर्गत नवीन मतदारांसह समाजातील दिव्यांग, तृतीयपंथी, वंचित घटक यांचा मतदार प्रक्रियेत सहभाग वाढवा यासाठी प्रशासनामार्फत विविध कार्यक्रमाचे आयोजन करून जनजागृती करण्यात येत आहे. १८ वर्षे वरील सर्व युवकांनी मतदार नोंदणी करून घ्यावी. सुदृढ लोकशाहीसाठी मिळालेल्या मतदानाच्या अधिकाराचा वापर करावा. मतदार यादीत नाव नोंदवणे व मतदानात भाग घेणे हे आपले कर्तव्य आहे असेही त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी तृतीय पंथीय मतदारांना मतदान कार्डचे वाटप केले तसेच मतदार नोंदणीसाठी मदत केलेल्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन विभागीय आयुक्त सौरभ राव यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.



मंगळवेढा : महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे शाखा दामाजीनगर यांच्यावतीने विभागीय साहित्य संमेलनाचे उद्घाटन करताना आ. समाधान आवताडे व इतर.

## साहित्य म्हणजे संवेदनशील समाज निर्मितीचे प्रतिबिंब : आ. आवताडे

**सुराज्य/मंगळवेढा**

साहित्य म्हणजे सार्वजनिक जीवनातील संवेदनशील समाज निर्मितीचे प्रतिबिंब होय, असे प्रतिपादन आ. समाधान आवताडे यांनी केले.

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे शाखा-दामाजीनगर (मंगळवेढा) यांच्यावतीने विभागीय 'साहित्य संमेलन-२०२३' या साहित्यिक संमेलनाचे उद्घाटन आ. समाधान आवताडे यांच्या हस्ते गणेश बालोद्यान, मंगळवेढा येथे झाले. त्यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी प्रा.लक्ष्मणराव ढोबळे, प्रख्यात कवी अरुण म्हात्रे, प्रा.मिलिंद जोशी, कोषाध्यक्ष सुनिताराजे पवार, विभागीय साहित्य संमेलनाचे समन्वयक पद्माकर कुलकर्णी, कल्याण शिंदे, अॅड. जे.जे कुलकर्णी, माजी प्राचार्य डॉ.आप्पासाहेब पुजारी, दामाजीनगर मसाप शाखेचे अध्यक्ष प्रकाश जडे, प्राचार्य डॉ.सुभाष कदम, राजन मुठाणे, डॉ. शरद शिर्के, दत्तात्रय जमदाडे, दिगंबर भगरे, लहु ढगे, लिना वीण, प्रशासकीय अधिकारी आनंद लोकरे, राजेंद्र भोसले आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त



अक्कलकोट: बोरामणी भागात नुकसानग्रस्त शेतीची पाहणी करताना आ.सचिन कल्याणशेट्टी.

### बोरामणी भागात नुकसानग्रस्त शेतीची आ. कल्याणशेट्टी यांच्याकडून पाहणी

दक्षिण सोलापूर : दक्षिण सोलापूर तालुक्यातील बोरामणी भागात अवकाळी पावसामुळे शेतीचे फार नुकसान झाले. आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी येथील नुकसानाची पाहणी केली. यावेळी नुकसानग्रस्त शेतकरी बांधवांशी संवाद साधत, त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या, नुकसानीचा आढावा घेतला. या पाहणीदरम्यान नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना धीर देत, प्रशासनाला तत्काळ पंचनामे करून लवकरात लवकर शेतकऱ्यांना मदत करण्याच्या सूचना दिल्या. या नागरिकांना शासनामार्फत शक्य तेवढी मदत मिळवून देण्यासाठी मी प्रयत्नशील आहे. त्यांना जास्तीत जास्त नुकसान भरपाई कशी मिळवून देता येईल, यासाठी मी प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी भारतीय जनता पक्षाचे अक्कलकोट तालुकाध्यक्ष मोतीराम राठोड, तालुका कृषी अधिकारी रामचंद्र माळी, तहसीलदार किरण जमदाडे, तलाठी गणेश गायकवाड आदी उपस्थित होते.

---



पंढरपूर : भाजपाच्या तीन राज्यातील विजयानंतर पंढरपूर-मंगळवेढ्यामध्ये भाजपाच्यावतीने जल्लोष करण्यात आला.

### भाजपाचा तीन राज्यात विजय; पंढरपूर-मंगळवेढ्यात जल्लोष

पंढरपूर : नुकत्याच झालेल्या पाच राज्यातील निवडणुकांपैकी तीन राज्याचे निकाल लागले. यामध्ये भारतीय जनता पक्षाने तीन प्रमुख राज्यात बहुमतात निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले आहे. भाजपाला तीन राज्यात मिळालेल्या निर्विवाद वर्चस्वाबद्दल पंढरपूर-मंगळवेढा विधानसभामतदार संघातील कार्यकर्त्यांनी मिठाई वाटून जल्लोष केला. यावेळी भाजपचे पश्चिम महाराष्ट्र संघटन सरचिटणीस मकरंद देशपांडे, जिल्हा सरचिटणीस शशिकांत चव्हाण, सरचिटणीस सिद्धेश्वर कोकरे, निवडणूक प्रमुख राजेंद्र सुरवसे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष सुदर्शन यादव, भाजपा पंचायत राज व ग्राम विकास विभाग जिल्हा सहसंयोजक प्रशांत सापनेकर, अभविपचे आनुप देवधर उपस्थित होते.

# ग्रामस्थांच्या अडी-अडचणी सोडविण्यास कटिबद्ध : आ. कल्याणशेट्टी

## करजगीत १८ गावच्या सरपंचांसह सभापती, सोसायटी चेअरमन यांचा सत्कार

सुराज्य/अक्कलकोट

**'करजगी गावाच्या चौफेर विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही. ग्रामस्थांनी सुचवलेल्या प्रत्येक अडचण सोडण्यास आपण कटिबद्ध असून, उंबरजे बंधूंवर विश्वास ठेवून प्रचंड मतांनी विजयी केलात. प्रेम आशीर्वाद त्यांच्या पाठीशी अखंडपणे ठेवा', असे आवाहन आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केले. ते करजगी (अक्कलकोट) येथे तालुक्यातील नवनिर्वाचित अठरा गावच्या सरपंचासह सर्व सदस्य बाजार समिती सभापती, विकास सेवा सोसायटी चेअरमन यांचा नागरी सत्कारासह विविध विकास कामांच्या शुभारंभप्रसंगी आयोजित कार्यक्रमात बोलत होते.**



यावेळी खासदार डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामीजी, शिवानंद महास्वामीजी (करजगी), आ. सचिन कल्याणशेट्टी, स्वामी समर्थ साखर कारखान्याचे चेअरमन संजीवकुमार पाटील, व्हाईस चेअरमन अप्पासाहेब पाटील, शिवानंद पाटील, भाजपा तालुकाध्यक्ष मोतीराम राठोड, शहराध्यक्ष शिवशरण जोजन, परमेश्वर यादवाड, मल्लिनाथ स्वामी, शिवसिद्ध बुळ्ळा, अशोक हिप्परगी, प्रकाश हिप्परगी, सुरेश सारणे, महेश हिंडोळे, श्रीशैल घिवारे उपस्थित होते.

आ. सचिन कल्याणशेट्टी पुढे म्हणाले, 'करजगीच्या ग्रामस्थांनी गुड्डद बसवराज ग्रामविकास पॅनलचे सर्व सर्वा उंबरजे बंधूंवर विश्वास ठेवून प्रचंड मताने विजयी केले. ते या विश्वासाला पात्र राहून अत्यंत पारदर्शकपणे कारभार करतील, यात शंकाच नाही.

यावेळी नगरसेवक महेश हिंडोळे, माजी जि. प. सदस्य शिवानंद पाटील, भाजपा माजी तालुकाध्यक्ष मल्लिनाथ स्वामी म्हणाले, 'गेल्या पंचवीस वर्षांपासून संघर्ष करणाऱ्या उंबरजे बंधूंवर यंदा ग्रामस्थांनी विश्वास दाखविला. या विश्वासाला ते पात्र राहून कारभार करतील. ग्रामस्थांनी त्यांच्या पाठीशी सदैव उभे राहावे.'

प्रास्ताविकात ॲड. दयानंद उंबरजे म्हणाले, 'आमदार, खासदार निधीतून करजगी गावच्या विकासासाठी भरपूर निधी मिळालेला आहे. त्यामुळे करजगी गावचे गेल्या वीस वर्षांपासून खुंटलेली विकास कामे आता मार्गी लागतील.'

याप्रसंगी रामण्णा अरवत, बाबूराव पाटील, सुरेश अर्जुने, सुरेश झळकी, निल्लप्पा शिवमूर्ती, कामगोंडा बाकी, मल्लिकार्जुन कारले, गुरुपाद मलक्कप्पा इंडी, इरण्णा गुब्याड, महादेव महाजन, निंगप्पा कलशेट्टी, महेबूब मुल्ला, गुरुपुत्र गंगदे, पिंटू पाटील, स्वामिनाथ चौगुले, मल्लिनाथ ढब्बे, मल्लिकार्जुन ढब्बे, ज्योती उण्णद, चंद्रकला कारीमुंगी, अरविंद भडोळे उपस्थित होते. याप्रसंगी अक्कलकोट तालुक्यातील १८ ग्रामपंचायतीच्या नूतन सरपंच सदस्य, दुधनी, अक्कलकोट बाजार समितीचे सभापती, सर्व संचालक, विकास सेवा सोसायटीचे चेअरमन यांच्यासह प्रशासकीय कर्मचाऱ्यांचा सत्कार, सन्मान करण्यात आला. सूत्रसंचालन पल्लवी पवार, आभार प्रदर्शन करजगीचे नूतन सरपंच विवेकानंद उंबरजे यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात गुड्डद बसवराज महास्वामीजी यांच्या प्रतिमेचे पूजन, दीपप्रज्वलन झाली.

### विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही

अध्यक्षस्थानावरून खासदार डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामीजी म्हणाले, 'ग्रामस्थांना सत्कार सन्मानपेक्षा आमदार, खासदारांच्या निधींतून विकास काम महत्त्वाचे आहे. राज्याचे मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली त्यांच्या दातृत्वाने तालुक्यातील प्रत्येक गावात विकास गंगा पोहोचलेला आहे. आगामी काळात विकास कामासाठी आणखी निधी लागल्यास कमी पडू देणार नाही.'

### अक्कलकोट-करजगी दुतर्फा रस्त्याचे काम मार्गी लावणार

अक्कलकोट-करजगी, करजगी- सुलेर जवळगे, अक्कलकोट-तडवळ दुतर्फा रस्त्याचे कामही लवकरात लवकर मार्गी लावणार असल्याचे आ. कल्याणशेट्टी यांनी सांगितले.

# माळीनगर फेस्टिव्हलचे दिमाखात उद्घाटन

सुराज्य/माळीनगर

माळीनगर फेस्टिव्हलचे उद्घाटन खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या हस्ते झाले. यावेळी क्रांतिज्योती महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरनगर या फलकाचे अनावरण केले.

याप्रसंगी दि सासवड माळीशुगर फॅक्टरी, दी माळी एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन राजेंद्र गिरमे, मॅनेजिंग डायरेक्टर सतीश गिरमे, संचालक मोहन लांडे, राहूल गिरमे, विशाल जाधव, निखील कुदळे, निळकंठ भोंगळे, प्रकाश गिरमे, निखील इनामके, अमोल ताम्हाणे, कपिल भोंगळे, महादेव एकतपुरे, प्राचार्य प्रकाश चवरे आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविकात माळीनगर फेस्टिव्हलचे आयोजक चेअरमन राजेंद्र गिरमे यांनी खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांना दोन लाख मतांचे लीड मिळवून देण्याचे आश्वासन देत आगामी निवडणुकीची साखरपेरणी केली आहे.





माळीनगर : माळीनगर फेस्टिव्हलच्या उद्घाटनप्रसंगी खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर, राजेंद्र गिरमे, सतीश गिरमे, मोहन लांडे, राहूल गिरमे आदी.

### माळीनगरचा पाणी प्रश्न मार्गी लावणार...

खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर म्हणाले, 'स्नेहसंमेलनात दर्जेदार आणि उत्तम कार्यक्रम पहायला मिळाले. माळशिरस तालुक्याच्या भविष्याचा विचार करून रेल्वे, पाण्याचा प्रश्न मार्गी लावला आहे. पंढरपूर-फलटण, चारपदरी रस्त्याच्या कामाचा आढावा घेत असतो. राजेंद्र गिरमे यांनी दोन लाखांचे लीड देण्याचे आश्वासन दिले. हा मित्र सतत माझ्या पाठीशी उभा राहिला, मी निश्चितच त्यांचा ऋणी आहे. लोकसभेत निवडून आल्यानंतर प्रथम मी माझ्या घरी न जाता राजेंद्र गिरमे यांच्या घरी गेलो होतो. माझी पहिली ओवाळणी येथे झाली. सुरुवातही माळीनगरमधूनच झाल्याने मी माळीनगरला कधीच विसरणार नाही. माळीनगर कारखान्याचे उत्तम व्यवस्थापन हा इतर साखर कारखान्यांपुढे आदर्श आहे, याचे मी नेहमी कौतुक करीत असतो.'



पेनूर परिसरात सर्व प्रकारच्या वाहनांना टोल फी माफ करावी, यासाठी पेनूर ग्रामस्थांच्यावतीने टोल प्लाझा व्यवस्थापकास निवेदन देताना प्रकाश कस्तुरे, रणजीत चवरे, रामदास चवरे व ग्रामस्थ.

# वाहनांना टोल माफ करण्याची मागणी; अन्यथा आंदोलन

## टोल प्लाझा व्यवस्थापकास ग्रामस्थांचे निवेदन

सुराज्य/मोहोळ

'पेनूर टोल प्लाझा येथे पेनूर परिसरातील सर्व प्रकारच्या वाहनांना टोल फी माफ करावी, यासाठी पेनूर ग्रामस्थांच्यावतीने टोल प्लाझा व्यवस्थापकास निवेदन देण्यात आले. जर टोल फी माफ केली गेली नाही, तर पेनूर ग्रामस्थांच्यावतीने उग्र आंदोलन करण्यात येईल', असा इशारा देण्यात आला.

पेनूर व परिसरातील शेतकऱ्यांच्या जमिनी टोल प्लाझाच्या पलीकडे असल्यामुळे शेतकऱ्यांना सतत आपल्या शेतात ये-जा करावी लागते. दुग्धव्यवसाय, शेतीची माल वाहतूक करणे, पेट्रोल-डिझेल भरण्यासाठी येणे-जाणे सतत करावे लागत आहे. एकाच व्यक्तीला अनेक वेळा टोल भरणे शक्य नसते. त्यामुळे पेनूर गावातील नागरिकांना टोल भरणे अशक्य आहे. यासाठी पेनूर ग्रामस्थांनी ग्रामसभा घेऊन ठराव केला. त्या ठरावाचे प्रत आणि निवेदन टोल प्लाझा व्यवस्थापकास देण्यात आले.

याप्रसंगी ज्येष्ठ नेते प्रकाश कस्तुरे, रणजीत चवरे, रामदास चवरे, माजी सरपंच रमेश माने, सज्जन चवरे, सर्जेराव चवरे, दिग्विजय माने, विठ्ठल माने, सज्जू शेख, अभिजित गवळी, तानाजी सावंत, सज्जन माने, शिवसागर गायकवाड, महेश चवरे, लक्ष्मण चवरे, तानाजी भोसले, रामहरी चवरे, मारुती चवरे, पैलवान अर्जुन चवरे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# लवंगमध्ये संसारोपयोगी साहित्याचे वाटप; जयसिंह मोहिते-पाटील यांचा वाढदिवस साजरा



अकलूज: जयसिंह मोहिते-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त अकलूजच्या सचिवा झेरॉक्सच्यावतीने संसारोपयोगी साहित्याचे वाटप केले. त्याप्रसंगी ज्योतिराम घाडगे आदी.

सुराज्य/अकलूज

जयसिंह (दादासाहेब) मोहिते-पाटील यांचा वाढदिवस, त्यांच्या अमृतमहोत्सवी वर्षाच्या वाटचालीनिमित्त लवंग येथील १५ महिलांना साड्या भेट देण्यात आल्या. छकुली भाग्यवंत गेजगे यांना २५ ते ३० हजार रुपयांचे संसारोपयोगी साहित्य भेट देण्यात आले. अकलूजच्या सविता झेरॉक्सच्यावतीने ज्योतिराम घाडगे आणि परिवार यांच्याकडून हा उपक्रम राबविण्यात आला.

याप्रसंगी सविता घाडगे, ज्योतिराम घाडगे, लवंगचे माजी ग्रामपंचायत सदस्य चव्हाण, विद्यमान ग्रामपंचायत सदस्य यशवंत गेजगे, महावीर पारसे, तानाजी पारसे, सोमनाथ केंगार, भारत शिंदे, लक्ष्मण गुळवे, नितीन गेजगे, महिला लाभार्थी उपस्थित होते.

# तेलंगणातील विजयाचा अक्कलकोटमध्ये जल्लोष

सुराज्य/अक्कलकोट

आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी गोवा विधानसभा निवडणुकीनंतर तेलंगणा राज्यातील कामारेड्डी मतदारसंघातील भाजपा उमेदवार निवडून आणून दिग्गज उमेदवारांना पराभव करीत करिष्मा कायम ठेवला आहे.

तेलंगणाचे मुख्यमंत्री के.चंद्रशेखर राव, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष व मुख्यमंत्री पदाचे उमेदवार रेवंत रेड्डी या दोघांचा पराभव करुन कामारेड्डी विधानसभेतून भाजपचे वेंकटरमण रेड्डी हे विजय होत जायंटकिलर ठरले आहे.

कामारेड्डी विधानसभा निवडणुकीचे प्रभारी म्हणून आमदार तथा भाजपा सोलापूर जिल्हाध्यक्ष सचिन कल्याणशेट्टी यांच्यावर जबाबदारी देण्यात आली होती.



वेंकट रमण रेड्डी यांच्या विजयामध्ये आमदार सचिन कल्याणशेट्टींचा सिंहाचा वाटा आहे. जबाबदारी मिळाल्यानंतर आमदार कल्याणशेट्टी यांनी रेड्डी यांच्या मतदारसंघात तब्बल दोन महिने तेथेच तळ ठोकला होता.

याकाळात त्यांनी मतदारांच्या प्रत्यक्ष गाठीभेटी, सभा घेत पूर्ण प्रचार यंत्रणा नियोजनबद्ध राबविली होती. त्यामुळे रेड्डी यांचा विजयामध्ये आमदार कल्याणशेट्टी यांनी वेंकट रमण रेड्डी विजयी करत जायंट किलर ठरवले आहेत.

तेलंगणाच्या कामारेड्डी विधानसभेची ही जागा व्हीआयपी सीट मानली जाते. आता पार पडलेल्या विधानसभेसाठी विद्यमान मुख्यमंत्री केसीआर आणि तेलंगणा काँग्रेसचे अध्यक्ष, भावी मुख्यमंत्री पदाच्या शर्यतीत असलेल्या रेवंत रेड्डी यांनी या जागेवरून निवडणूक लढवली होती. भाजपने कट्टीपल्ली वेंकट रमण रेड्डी यांना उमेदवारी दिली. या दोन्ही दिग्गजांना पराभूत करण्याचे आव्हान भाजपसमोर होते. मात्र, आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी लावलेल्या फिल्डींगमुळे कट्टीपल्ली वेंकट रमण रेड्डी यांनी दोघांचा परभव करत सर्वांनाच चकित केले आहे.

याअगोदार आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी गोवा राज्यातील मर्ईम मतदारसंघातील भाजपा उमेदवार प्रेमेंद्र सेठ यांना निवडून आणण्यासाठी भाजपा प्रदेशने दिलेली जबाबदारी देखील उत्तमरित्या पार पाडली होती.

# पंढरपुरात ३० ठिकाणी सह्यांची मोहीम

सुराज्य/पंढरपूर

पंढरपूर नगर परिषदेने शहरातील नागरिक, मालमत्ता धारकांची भरमसाठ केलेली करवाढीचा तीव्र विरोध होत आहे. करवाढ रद्द करावी यासाठी नगर परिषदेच्या विरोधात सह्यांच्या मोहीमेस प्रारंभ झाला.याअंतर्गत शहरातील ३० विविध ठिकाणी ही मोहीम राबविली जात आहे.

ही मोहीम पंढरपूर शहरात महाविकास आघाडीच्यावतीने श्री विठ्ठल सहकारी सहकारी साखर कारखाना (वेणूनगर-गुरसाळे) चेअरमन अभिजीतआबा पाटील यांच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज चौक पंढरपूर येथे राबविण्यात येत आहे.





पंढरपूर:महाविकास आघाडीतर्फे भरमसाठ करवाढीविरोधात सह्यांची मोहीम राबविली जात आहे.

पंढरपूर नगरपरिषदेच्या विरोधात पंढरपूरच्या जनतेत असलेला रोष शासनापर्यंत पोहोचवण्याचा हा लोकशाही मार्ग अवलंबण्यात येत आहे, अशी माहिती महाविकास आघाडीच्यावतीने देण्यात आली आहे.

पंढरपूर नगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता धारकांच्या नवीन करनिर्धारणाच्या २०२३-२४ ते २०२७-२८ नोटिसा वाटप करण्याचे काम सध्या नगरपालिकेच्यावतीने सुरु आहे. त्या नाटिशीला उत्तर देण्यासाठी दि. १२ डिसेंबर ही मुदत दिली आहे. अद्यापही नोटीस बजावण्याचे काम सुरुच आहे. नोटीसीमध्ये जाहीर प्रसिद्धीकरण केल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत आपले म्हणणे लेखी स्वरुपात मांडावेत. आकारणीची पध्दत, घेतलेले मोजमाप याची माहिती घेण्यासाठी नगरपालिकेच्या कार्यालयात समक्ष यावेत, असेही सुचित केले आहे. सदर करवाढीची नोटीस प्रसिद्धीकरण करण्याची तारीख दि. १३ नोव्हेंबर दिवाळीमध्ये आणि आक्षेप घेण्याची मुदत दि. १२ डिसेंबरपर्यंत होय.

नागरीक, करदात्यांना केवळ बारा दिवसांचा कालावधी या नोटिशीस उत्तर देण्यासाठी उपलब्ध होत आहे. म्हणजेच यासाठी त्यांना पुरेसा कालावधीदेखील मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे.

वास्तविक दिवाळीचा कालावधी व त्यानंतर होणारी कार्तिकी यात्रा हा कालावधी वगळून नंतरही किंवा दिवाळीपूर्वी एक महिना सूचना प्रसिद्ध करता आली असती. येथील करदात्यांना कायदेशीररित्या आक्षेप घेण्यासाठी ३० दिवसांची मुदत उपलब्ध करून देता आली नाही. म्हणजेच येथील नागरिकांना आक्षेप तक्रारी नोंदवण्यासाठी पुरेसा वेळ मिळू नये ही बाब नगरपालिकेने विचारात घेतली की नाही, अशी शंका येते.

# बाळदादांना अनोख्या पध्दतीने दिल्या वाढदिवसाच्या शुभेच्छा!

सुराज्य/अकलूज

शिक्षण प्रसारक मंडळ अकलूजचे मार्गदर्शक संचालक जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील तथा बाळदादा यांचा नुकताच ७४ वा वाढदिवस साजरा झाला. त्यांची ७५ व्या अमृत महोत्सवी वर्षाकडे वाटचाल सुरु झाली. यानिमित्त जिजामाता कन्या प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाच्यावतीने त्यांना अनोख्या पद्धतीने शुभेच्छा दिल्या.

प्रशालेच्यावतीने ७५ शुभेच्छापत्रे दादांना पाठवण्यात आली. एका पत्राचे वाचन विद्यार्थिनी गौरी पराडे हिने बाळदादा यांच्या समोर करून शाबासकी मिळवली. प्रशालेच्यावतीने ७५ शुभेच्छापत्रे दादांना पाठविली.



त्यापैकी एक जयसिंह मोहिते-पाटील यांचा जीवनपट सांगणारे आहे. सन १९९९ च्या आनंद यात्रेपासून आजपर्यंतच्या दादांच्या जीवन प्रवासातील अनेक गोष्टी त्याच्यामध्ये वर्णन केल्या होत्या.

प्रशालेतील विद्यार्थिनी गौरी पराडे हिने पोस्टवुमनची भुमिका साकारली. दादांना पत्र देताना तिने एक पत्र वाचून दाखवण्याची परवानगी मागितली.

पत्रवाचन केले. पत्रातील मजकूर ऐकून दादांच्या आठवणींना उजाळा मिळाला आणि दादासुद्धा भावूक झाले. याप्रसंगी मुख्याध्यापिका सुनिता वाघ, सहशिक्षिका कनबूर, तानाजी भोसले, रोहीत माने उपस्थित होते. पत्रवाचन गौरी पराडे हिने तर पत्र लेखन रोहीत माने यांनी केले होते.

## संक्षिप्त वृत्त

### आम्ही तुमच्या कल्याणासाठी अथक प्रयत्न करू



जनता जनार्दनाला नमन करतो. छत्तीसगड, मध्य प्रदेश आणि राजस्थानमधील निकाल हे दर्शवतात की भारतातील लोक सुशासन आणि विकासाच्या राजकारणासोबत ठाम आहेत. भाजप यावर ठामपणे उभी आहे. मी या राज्यांतील लोकांचे त्यांच्या अटळ पाठिंब्याबद्दल आभार मानतो आणि त्यांना आश्वासन देतो की आम्ही त्यांच्या कल्याणासाठी अथक प्रयत्न करत राहू. कष्ट घेणाऱ्या पक्ष कार्यकर्त्यांचे विशेष आभार. त्यापैकी प्रत्येक अनुकरणीय आहे, त्यांनी अथक परिश्रम करून आमचा विकासाचा अजेंडा लोकांसमोर मांडला आहे, अशा शब्दात मोदींनी चार राज्याच्या निवडणूक निकालावर प्रतिक्रिया दिली.

### विचारधारेची लढाई सुरूच राहील



मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि राजस्थानचा जनादेश आम्ही नम्रपणे स्वीकारतो, मात्र विचारधारेची लढाई सुरूच राहील असं ट्विट करत काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी तेलंगणात मिळालेल्या स्पष्ट बहुमताबद्दल तेथील जनतेचे आभार मानले आहेत.

### जनतेच्या मनात केवळ मोदी



जनतेच्या मनात केवळ आणि केवळ मोदी आहेत. आजच्या निवडणूक निकालांनी हे सिद्ध केले आहे की, तुष्टीकरण आणि जातीवर राजकारणाचे दिवस आता संपले आहेत. आता नवा भारत हा पॉलिटिक्स ऑफ परफॉर्मन्सवर मदतान करतो. या प्रचंड पाठिंब्याबद्दल मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि राजस्थानमधील जनतेला नमन करतो. भाजपच्या या भव्य विजयाबद्दल पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांचे खूप खूप अभिनंदन, असे ट्विट अमित शाह यांनी केले आहे.

### भाजपच्या अनुकूल असा ट्रेंड दिसतोय



तेलंगणामध्ये पहिल्यापासून एक असे चित्र दिसत होते की, ज्यांच्या हातात सत्ता आहे त्यांच्यात हातात ते राज्य राहिल. पण, राहुल गांधींची एक जाहीरसभा हैदराबादला झाली. त्याची उपस्थिती पाहिल्यानंतर आम्हा लोकांची खात्री झाली की, इथे परिवर्तन होईल. तसे तिथे आता दिसतंय. एक गोष्ट मान्य केली पाहिजे की यामध्ये भाजपच्या अनुकूल असा ट्रेंड दिसतोय, असे महत्त्वाचे निरीक्षण शरद पवारांनी नोंदवले.

### २०२४ मध्ये इंडिया आघाडीचे पानीपत होईल




घर घर मोदी म्हणायचे आता मन मन मोदी असे निकाल आता लागले आहेत. मोदींचा करिष्मा संपला असे काही लोक म्हणत होते. मोदींना बदनाम करण्याचा प्रयत्न केला. जनतेने या निवडणुकांमध्ये मोदींना साथ दिली. मोदींचा करिष्मा, लोकांमध्ये असलेली लोकप्रियता ते लोकप्रियतेत एक नंबरवर आहेत हे पुन्हा सिद्ध झाले. राहुल गांधींनी परदेशात देशाला बदनाम केले. मोदींना हरवण्यासाठीइंडिया आघाडी एकत्र आली आहे. २०२४ मध्ये इंडिया आघाडीचे पानिपत होईल.

### पुन्हा एकदा महाराष्ट्रात आणि देशात भाजप



तीन राज्यात भाजपला अभूतपूर्व यश मिळाले आहे. हे जनतेचा पंतप्रधान मोदींवरील विश्वास त्याचेच हे यश आहे. तसेच मोदींनी पारदर्शीपणे विकासाचा अजेंडा चालवला. या विजयाचे श्रेय नरेंद्र मोदी, जेपी नड्डा आणि अमित शहा यांना जात असल्याचे देवेंद्र फडणवीसांनी सांगितले आहे. आता निवडणूकीच्या या निकालानंतर इंडिआ आघाडीची बैठक होईल आणि बैठकीत पराभवाचे कारण ईव्हीएमवर फोडले जाईल. मात्र तरीही जनता मोदीजींच्या पाठिशी असल्याचा विश्वास देवेंद्र फडणवीसांनी व्यक्त केला. हिच परिस्थिती महाराष्ट्रात देखील आहे. महाराष्ट्रातील ग्राम पंचायतीतही दोन तृतीयांश ग्रामपंचायती महायुतीने जिंकल्या आहेत आणि लोकसभेत तेच पाहायला मिळणार आहे.जो विकास आणि विश्वास मोदीजींनी तयार केला आहे.

### मोदी, शाह यांच्यासह सगळ्यांचे अभिनंदन



इंडिया-इंडिया करणारे जे आहेत, ते आता ईव्हीएम मशिनमध्ये घोटाळा झाला, अशा पद्धतीचं बोलायला सुरुवात करतील. पण त्यात काहीही तथ्य नाही. लोकांनी पंतप्रधान मोदींकडे बघून भाजपला पाठिंबा दिला आहे. या विजयाबद्दल मी नरेंद्र मोदी, अमित शाह यांच्यासह सगळ्यांचे अभिनंदन करतो, अशी प्रतिक्रिया श्रीवर्धन येथे पत्रकारांशी बोलताना अजित पवार यांनी दिली आहे.





### 'इंडिया'ची बैठक; ६ रोजी विरोधक एकवटणार

मध्य प्रदेश, छत्तीसगड, राजस्थान आणि तेलंगणामध्ये आज, रविवारी मतमोजणी झाली. तेलंगणावगळता मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि राजस्थान या राज्यांत भाजपा सत्ता स्थापन होत आहे. ही निवडणूक लोकसभेची सेमीफायनल समजली जात होती. या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी ६ डिसेंबर रोजी दिल्लीत विरोधकांची आघाडी असलेल्या 'इंडिया'ची बैठक बोलावली आहे.

# देशात फक्त चारच जाती महत्त्वाच्या

## पंतप्रधान नरेंद्र मोदी | निकालानंतर भाजप मुख्यालयातून जनतेला संबोधन



नवी दिल्ली

पाचपैकी चार राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल स्पष्ट झाले असून त्यापैकी तीन राज्यांमध्ये भाजपाने काँग्रेसविरोधात मोठा विजय मिळवला आहे. राजस्थान, मध्य प्रदेश व छत्तीसगडमध्ये भाजपाला स्पष्ट बहुमत मिळाले आहे. तर तेलंगणामध्ये काँग्रेसने केसीआर यांच्या १० वर्षांच्या सत्ताकाळावर पूर्णविराम लावत रेवंत रेड्डी यांच्या नेतृत्वाखाली बहुमत प्राप्त केले. या पार्श्वभूमीवर देशभरात भाजपा कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असताना पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दिल्लीत भाजपा मुख्यालयात कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांसमोर सविस्तर भूमिका मांडली. यावेळी त्यांनी विरोधकांवर जातीपातीचे राजकारण केल्यामुळे पराभव झाल्याचा आरोप केला.

### माझ्यासाठी देशात चारच जाती महत्त्वाच्या

मोदींनी विरोधकांवर जातीपातींचे राजकारण केल्याचा आरोप केला. या निवडणुकीत देशाला जातीजातींमध्ये वाटण्याचा खूप प्रयत्न झाला. पण मी सातत्याने म्हणत होतो की माझ्यासाठी देशात चारच जाती सर्वात मोठ्या आहेत. जेव्हा मी या चार जातींबाबत बोलतो, तेव्हा आपली स्त्रीशक्ती, युवा शक्ती, आपले शेतकरी आणि आपले गरीब कुटुंब या चार जातींना सशक्त केल्यामुळेच फक्त देश सशक्त होऊ शकतो, असं मोदी यावेळी म्हणाले.आपले ओबीसी, आदिवासी सहकारी याच वर्गातून येतात. या निवडणुकीत या चारही जातींनी भाजपाच्या योजना आणि रोडमॅपबाबत मोठा उत्साह दाखवला आहे. आज प्रत्येक गरीब, तरुण, आदिवासी, शेतकरी हे सांगतोय की तो स्वत:च जिंकला आहे.

### तेलंगणात भाजपचा चढता आलेख

काँग्रेसला मोदींनी भाषणाच्या सुरुवातीलाच टोला लगावला. मोदींनी भारत माता की जयचा नारा दिल्यानंतर समोरून त्यांना अत्यंत अल्प प्रतिसाद आला. त्यावर घोषणांचा आवाज थेट तेलंगणापर्यंत पोहोचायला हवा, असं मोदींनी म्हणताच समोरून मोठ्या आवाजाच घोषणा येऊ लागल्या. आजचा विजय ऐतिहासिक आहे. अभूतपूर्व आहे. तेलंगणातही भाजपाला समर्थन वाढत आहे, असंही मोदींनी यावेळी नमूद केले. तेलंगणामध्ये पराभव झाला असला, तरी भाजपाचा आलेख कायम वर जाणारा असल्याचं मोदी म्हणाले. तेलंगणात प्रत्येक निवडणुकीत भाजपाचा आलेख सातत्याने वर चढत चालला आहे. मी तेलंगणाच्या लोकांना विश्वास देतो की भाजपा तुमच्या सेवेत कोणतीही कसर ठेवणार नाही, असे मोदी म्हणाले.

# मामांच्या 'लाडली'मुळे भाजपचे चौफेर 'लाड'

## मध्य प्रदेश



**भोपाळ :** देशातील पाच राज्यांपैकी चार राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचा निकाल लागत असून, मध्य प्रदेशमधील जनतेने पुन्हा एकदा कमलनाथ ऐवजी कमळाला' पसंती दिली आहे. भाजपाच्या या विजयामागील कारणांचे विश्लेषण केले असता भाजपचे स्टार प्रचारक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेला झंझावती प्रचार आणि शिवराज सिंह चौहान यांनी महिलांसाठी आणलेल्या योजनामुळे मध्य प्रदेशमध्ये पुन्हा एकदा कमळ'च फुलल्याचे दिसून आले

भाजपला मिळालेल्या निकालाबाबत बोलताना काळजीवाहू मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी स्पष्ट केले की, केंद्र सरकारने आणलेल्या योजना मध्य प्रदेशात व्यवस्थित राबवल्या. सोबतच मध्य प्रदेश सरकारने महिलांना समोर ठेऊन विविध योजना राबवल्या. यामध्ये लाडली लक्ष्मीपासून लाडली बहिणीपर्यंत योजनांचा समावेश आहे. यासोबतच गरिबांसाठी, शेतकऱ्यांसाठी, युवक, युवतींसाठी जे काम राज्य सरकारने केले त्याचे फलित आजच्या निकालातून दिसून आले. यासोबतच राजकीय चाणक्य म्हणून ओळख असलेले केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची अचूक रणनिती यावेळी मध्य प्रदेशात लागू पडली.

भारत जोडो यात्रा मध्य प्रदेशमध्ये १२ दिवस होती. या यात्रेने तब्बल ३८६ कि.मी.चा प्रवास केला. या कालावधीत बुरहानपूर, खंडवा, खरगोन, इंदूर, उज्जैन आणि आगर माळवा जिल्ह्यातून यात्रा सुरू झाली होती. ४ डिसेंबर २०२२ रोजी आगर माळवा जिल्ह्यातून यात्रा राजस्थानमध्ये निघून गेली होती. राहुल गांधी यांच्या मध्य प्रदेशमधील भारत जोडो यात्रेत कमलनाथ यांनीही प्रवास केला होता. या भारत जोडो यात्रेचा या निवडणुकीत काहीच परिणाम झालेला दिसला नाही.

### महिलांसाठी राबवलेल्या योजना

मध्य प्रदेश सरकारने लाडली लक्ष्मी ते लाडली बहिण ही योजना, सोबतच स्थानिक निवडणुकीमध्ये महिलांसाठी ५० टक्के आरक्षण, कन्या विवाह, तसेच पंतप्रधानमंत्री मातृवंदन योजना योग्य पद्धतीने राबवणे, बेटी बचाव, बेटी पढाओ योजना, खरेदी विक्रीच्या व्यवहारात महिलांना ५० टक्के सूट, ३५ टक्के भरती प्रक्रियेत महिलांना स्थान या सगळ्यांचा परिपाक म्हणजे भाजपला घवघवीत यश मिळाले.

# अंतर्गत कलहामुळे काँग्रेसने हातचा गढ गमावला

## राजस्थान

**जयपूर :** राजस्थानच्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा मोठा पराभव होताना दिसत आहे. या राज्यात भाजप सत्ता स्थापनेच्या वाटेवर आहे. एकूणच भाजप जादुई आकडा गाठणार हे निश्चित झाले आहे. मात्र आता राजस्थानच्या मुख्यमंत्रीपदी कोण विराजमान होणार हा प्रश्न अधांतरी आहे. दरम्यान भाजपच्या विजयाबाबत बोलायचं झालं तर राजस्थानमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जादू चालली तर काँग्रेस पक्षातील अंतर्गत कलहाच्या सावटामुळे जादूगर समजल्या जाणाऱ्या अशोक गहलोत यांची जादू फेल ठरल्याचं दिसून येत आहे.

राजस्थानमध्ये काँग्रेस पक्षातील दोन मोठ्या नेत्यांमध्ये असलेला अंतर्गत कलह पराभवाला कारणीभूत ठरला आहे. अशोक गहलोत आणि सचिन पायलट हे दोनही नेते प्रचारादरम्यान एकदाही एकत्र दिसले नाहीत. तर काँग्रेसच्या



वरिष्ठांनाही हा कलह सोडवण्यात अपयश आलं. याउलट भाजपाने राजस्थानमध्ये मोठ्या नेत्यांना मैदानात उतरवून एकहाती विजय मिळवला.

राजस्थानमध्ये काँग्रेसने दिलेली आश्वासने आणि घोषित केलेल्या योजना राज्यातील जनतेने मान्य केल्या नाहीत. नवे १९ जिल्हे निर्माण करण्याची गहलोत यांची चालही अयशस्वी ठरली. नवीन जिल्ह्यांमध्ये येणाऱ्या ५० पैकी बहुतांश विधानसभा जागांवर भाजप विजयी झाले आहे.

कधी काळी भाजपाचा एक हाती बालेकिल्ला लढवणाऱ्या वसुंधरा राजे यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप करत सचिन पायलट यांनी आंदोलन केलं होतं. मात्र, भ्रष्टाचाराचे आरोप जनतेने अमान्य केल्याचे दिसत आहे. भाजपच्या एक हाती विजयामुळे आता वसुंधरा राजे यांचे नाव मुख्यमंत्री पदासाठी चर्चेत आहे.

### खासदारांना रिंगणात उतरवणे ठरले फायदेशीर

भाजपाने यावेळी खासदारांना रिंगणात उतरवण्याची रणनिती आखली. ही रणनिती यशस्वी ठरल्याचे दिसत आहे. राजस्थानमध्ये ७ विद्यमान खासदारांना भाजपाने तिकीट दिले होतं. यातील चार खासदार पराजयाच्या वाटेवर तर उर्वरित तीन बहुमत गाठण्याच्या तयारीत आहेत.

# काँग्रेसची जोरदार मुसंडी

## तेलंगणा

- ओवेसींना धक्का
- भाजपने करिश्मा करुन दाखवला
- तेलंगणात पराभव होऊनही भाजपला लॉटरी लागली
- केसीआर यांच्या बीआरएसला मोठा धक्का
- भाजपची १ जागेवरुन १० पर्यंत मजल



**हैदराबाद :** तेलंगणाचे आतापर्यंतचे जे निकाल हाती आले आहेत त्यावरुन तेलंगणात काँग्रेसचं सरकार स्थापन होणार असं चित्र दिसत आहे. तर केसीआर यांचा पक्ष बीआरएस हा दुसऱ्या क्रमांकावर आहे. तर भाजप ही १० जागांवर आघाडीसह तिसऱ्या स्थानावर आहे. आतापर्यंत झालेल्या मतमोजणीनुसार काँग्रेस ६९ जागांवर आघाडीवर आहे. बीआरएस ३९ जागांवर आगाडीवर आहे. तर भाजप १० जागांवर आघाडीवर आहे. हा आकडा जरी कमी असला तरी भाजपसाठी ही कुठल्या लॉटरीपेक्षा कमी नाही. त्याचे कारण म्हणजे २०१८ मध्ये भाजपने फक्त एक जागा जिंकली होती. या निवडणुकित भाजपने असदुद्दीन ओवेसी यांना त्यांचा बालेकिल्ला असलेल्या हैदराबादमध्ये कडवे आव्हान दिले. त्यामुळे ओवेसी यांच्यासाठी हा धक्का मानला जात आहे.

तेलंगणाच्या राजकारणात केसीआर यांच्या बीआरएस आणि काँग्रेस पक्षाचे वर्चस्व राहिले आहे. पण यंदा भाजपने करिश्मा करुन दाखवला आहे. २०१८ मध्ये फक्त एक जागा जिंकणाऱ्या भाजपने यावेळी १० जागांवर आघाडी मिळवली आहे. त्यासोबतच भाजपच्या मतांचा टक्का १३.७६ झाला आहे. हे म्हणजे भाजपला लॉटरीच लागली असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. याचा भाजपला लोकसभेच्या निवडणुकांमध्ये फायदा होऊ शकतो.

तेलंगणा येथे एकवरुन १० वर जाण्यासाठी निवडणुका जाहीर होण्याच्या काही दिवसांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अनेक सभा घेतल्या. तसेच, मोदींनी येथे राष्टीय हळद बोर्ट बनवण्याची घोषणा करत राज्यातील नागरिकांची कित्येक वर्षांची मागणी पूर्ण केली. त्याशिवाय भाजपने संपूर्ण निवडणूक प्रचारादरम्यान बीआरएस आणि काँग्रेस सरकारच्या अयशस्वी कामांचा पाढा वारंवार वाचला. इतकेच नाही तर भाजपने शेतकरी आणि महिलांच्या फायद्याच्या योजनांवरही लक्ष केंद्रित केलं.

# छत्तीसगढमध्ये एक्झिट पोल्सचे सर्व अंदाज फेल

## छत्तीसगढ



**रायपूर :** आगामी लोकसभा निवडणुकींची सेमी फायनल म्हणून बघितल्या जाणाऱ्या चार राज्यांच्या विधानसभा निवडणुकींचे निकाल जाहीर झाले. मध्य प्रदेश, राजस्थान, तेलंगणा, छत्तीसगढ आणि मिझोराम या पाच राज्यांमध्ये मतदान प्रक्रिया संपन्न झाल्यानंतर सर्वांना निकालाचे वेध लागले होते.

यापैकी मिझोराम वगळता उर्वरित चार राज्यांमध्ये मतमोजणीला सकाळपासून सुरुवात झाली. या कालावधीत चारही राज्यांमध्ये निकाल नेमका कोणाच्या बाजूने लागणार, हे चित्र जवळपास स्पष्ट झाले आहे. या सगळ्यात छत्तीसगढचा निकाल चर्चेचा विषय ठरत आहे. मतमोजणीच्या सुरुवातीच्या टप्प्यात काँग्रेसने छत्तीसगढमध्ये आघाडी घेतली होती. त्यामुळे सुरुवातीच्या तासाभरातच अनेकांनी छत्तीसगढमध्ये काँग्रेसचे सरकार स्थापन होणार, अशी अटकळ अनेकांनी बांधली होती. मात्र, नंतरच्या टप्प्यात भाजपने आश्चर्यकारकरित्या आघाडी घेत काँग्रेसला मागे सारले.

# अरे भाई छोड़ो अखिलेश, वखिलेश

## काँग्रेसला नडला अहंकार

**राजस्थान :** काही दिवसांपूर्वीच मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री कमलनाथ यांनी अरे भाई छोड़ो अखिलेश, वखिलेश अशी टिप्पणी केली होती. आज मध्य प्रदेशातील स्थिती पाहता कमलनाथ यांना अंदाज आला असेल. कर्नाटक निवडणुकीनंतर काँग्रेसला नडलेला अतिआत्म विश्वास सुद्धा जमिनीवर घेऊन आला आहे. गेल्या काही दिवसांपासून इंडिया आघाडीसाठी बोलणी करूनही बॅकफूटवर गेलेल्या नितीशकुमार यांच्यावर पुन्हा फोकस येऊ शकतो. त्यांनी काँग्रेसच्या वर्तनावर तोफ डागली होती. दुसरीकडे, महाराष्ट्रातून शरद पवार आणि उद्धव ठाकरे इंडियामधील महत्वाचा घटक असणार आहे.


# 'इंडिया'त काँग्रेसचा गेम? तीन राज्यात पानिपत



**नवी दिल्ली :** सेमी फायनलमध्ये माती खाल्ल्याने आता काँग्रेसचा राजकीय गेम झाल्याची चर्चा आहे. या पराभवानंतर काँग्रेसला पुन्हा एकदा विरोधकांच्या इंडिया आघाडीची आठवण झाली. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीची रणनीती आखण्यासाठी येत्या इंडिया आघाडीतल्या मित्रपक्षांची बैठक बोलावण्यात आलीय. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगेंनी सगळ्यांना बैठकीचं निमंत्रण दिले आहे.

विरोधकांनी सत्ताधारी भाजपच्या विरोधात इंडिया आघाडी स्थापन केल्यानंतरच्या या पहिल्याच निवडणुका होत्या. इंडिया आघाडी या निवडणुका एकत्रितपणे लढवेल, अशी अपेक्षा होती. मात्र काँग्रेसनं मित्रपक्षांना विश्वासात न घेता राहुल गांधींच्या नेतृत्वात स्वबळावर शक्तिप्रदर्शन केले.

मध्य प्रदेशात इंडिया आघाडी म्हणून निवडणुका लढवण्याचा प्रस्ताव सपा नेते अखिलेश यादवांनी दिला. मात्र काँग्रेसनं हा प्रस्ताव धुडकावला. ६ डिसेंबरच्या बैठकीत मित्रपक्षांची नाराजी उघड होण्याची शक्यता आहे. या पराभवामुळे काँग्रेसला बॅकफूटवर जावे लागेल, अशी चर्चा आहे.



# काकाचा पुतण्यावर दणदणीत विजय

**मुंबई :** छत्तीसगडमध्ये काँग्रेसचा विजय झाला नसला तरी मुख्यमंत्री भूपेश बघेल यांना त्यांची जागा वाचवण्यात यश आले आहे. मुख्यमंत्री भूपेश बघेल यांनी पाटणमधून त्यांचे पुतणे आणि भाजप खासदार विजय बघेल यांचा १९७२३ मतांनी पराभव केला आहे. पाटणमध्ये विजय बघेल यांना ७५७१५ मते मिळाली. तर मुख्यमंत्री बघेल यांना ९५४३८ मते मिळाली आहेत.

# 'पीएम' होता होता केसीआर यांनी मुख्यमंत्रीपदही गमावले



**हैदराबाद :** तेलंगणामध्ये काँग्रेसला स्पष्ट बहुमत मिळाल आहे. येथे भारत राष्ट्र समितीला (बीआरएस) पराभूत करुन काँग्रेसने विजयाचा झेंडा फडकवला आहे. माजी मुख्यमंत्री आणि बीआरएसचे अध्यक्ष केसीआर यांचा राष्ट्रीय राजकारणात येण्याचा मोह त्यांच्या पराभवाचे प्रमुख कारण मानले जात आहे. तिसरी आघाडी स्थापन करुन पंतप्रधान होण्याची त्यांची इच्छा लपून राहिली नव्हती. यासाठी त्यांचे विविध राज्यात वाढलेले दौरे आणि यामुळे गृहराज्य तेलंगणाकडे झालेले दुर्लक्ष या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे रविवारी लागलेला तेलंगणाचा निकाल आहे.

या निवडणुकीत के. चंद्रशेखर राव मुख्यमंत्री म्हणून हॅट्रिक करतील अशी अनेकांना आशा होती. मात्र सलग दहा वर्षे मुख्यमंत्री राहिलेल्या केसीआर यांच्यासह त्यांच्या बीआरएस पक्षाला मोठा झटका बसला आहे. केसीआर यांच्या पराभवासाठी प्रमुख कारण हे त्यांची राष्ट्रीय राजकारणातील महत्त्वाककांक्षा मानले जात आहे.




# सांगोल्यात 'आबासाहेबांनंतर बाबासाहेबच'

## स्व. गणपतराव देशमुखांच्या विचाराचा वारसा चालविणारा डॉ.बाबासाहेब देशमुख

**सांगोला तालुक्यातील माळरानावर बाभळीच्या झाडाखाली बसलेल्या म्हाताऱ्या आज्जीला एकीनं हटकलं, ' आजी बरं हाय न्हवं, तब्येत सांभाळा..एका झटक्यात म्हातारी उत्तरली, मला काय झालंय, गुळी न्हाय की फिळी न्हाय, चार दिसा पहिलं 'बाबासाहेब' आलं व्हतं, त्यांनी तपासलंय..बीपी, साखर काईच न्हाय म्हणालं...पोरांन गालावर हात फिरवला अन समदं फिटलं बघं. खाटंवर बसा म्हंटलं तर नकू म्हणत खालीच माझ्याजवळ बसलं. ख्यालीखुशाली इचारली. लयं साधं प्वॉर, त्याला आमदार झालेलं बघितलं की मी डोळं मिटायला मोकळी झाली बघ..! हि वाक्य आहेत सांगोल्याच्या डॉक्टर असणाऱ्या बाबासाहेब देशमुखांच्या बद्दल.**

सोलापूर जिल्ह्यासह राज्यात आदराने नाव घेतले जाणारे,ऋषीतुल्य नेतृत्व म्हणजे सांगोल्याचे गणपतराव (आबासाहेब) देशमुख सहा दशकाहून अधिक वर्षे विधिमंडळाच्या राजकारण सक्रिय असणाऱ्या आबासाहेबांनी मंत्रीमंडळात अनेक पदे भुषविली. राजकारण राहून ही एकही डाग अंगावर नसलेला सध्याच्या पिढीने पाहिलेला हा शेवटचा नेता.आबासाहेबांच्या पश्चात त्यांचा वारसा त्यांचे नातू डॉ. बाबासाहेब देशमुख हे त्यांच्याच पावलावर पाउल ठेवून चालविताना दिसत आहेत.

सार्वजनिक जीवनातील आपले सबंध आयुष्य सभ्यता, साधी राहणी आणि मानवी विचारांची कास धरून जगलेल्या माजी मंत्री गणपतराव (आबासाहेब) देशमुख यांच्या नातवाबद्दल एका म्हाताऱ्या आज्जीची ही भावना डॉ. बाबासाहेब पोपटराव देशमुख हे आबासाहेबांचा वारसा ते किती सक्षमपणे चालवत आहेत याची प्रचिती देऊन गेली.





सांगोला तालुक्याच्या राजकीय क्षेत्रात आबासाहेबांचा हा नितळ चारित्र्याचा वारसा डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी मोठ्या नेटाने चालविला आहे. 'आबासाहेबांचा नातू आला, तो भेटला' या एकाच भावनेने गावागावातले शेकापचे जुने कार्यकर्ते, महिला आनंदून जात आहेत. कोल्हापूर व कोलकात्ता येथे वैद्यकीय शिक्षण पूर्ण केल्यानंतर आपल्याच क्षेत्रात करिअर करण्याची त्यांची इच्छा होती. मात्र, आबासाहेबाच्या निधनानंतर तालुक्यातील जनतेच्या आग्रहास्तव डॉ.बाबासाहेब सक्रिय राजकारणात आले. जगभरातील आर्थिक, सामाजिक घडामोंडीचा अभ्यास असणाऱ्या बाबासाहेबांनी तालुक्याची नाळ पटकन ओळखली. आबासाहेबानंतर जनतेला आधार देण्याची गरज असताना त्यांनी संगेवाडीपासून डोंगरपाचेगावपर्यंत तर नराळेपासून खवसपूरपर्यंत वाड्या, वस्त्यांवर पायाला भिंगरी बांधून गाव ना गाव धुंडाळले. जेथे जाईल तेथे वृद्धांचे आरोग्य तपासायचे. नागरिकांना व्यसनापासून दूर रहा असा सल्ला देतानाच मुलामुलींना उच्चशिक्षणाच्या वाटांबाबतही ते सतत मार्गदर्शन करत असतात. आपल्या जनतेबद्दल इतकी आपुलकी दाखवणारा हा नेता तालुक्याच्या गळ्यातील ताईत बनला आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या विजयाचा मार्ग त्यांच्या याच सामाजिक सेतूमधून गेला नाही तरच नवल. शेतकरी कामगार पक्षाच्या निष्टावंत कार्यकर्त्यांशी एकजूट करतानाच शेवटच्या फळींतील कार्यकर्त्यांचेही मत विचारात घेणारा, त्यांच्या सुखदु:खात सहभागी होणारा हा नेता जिल्ह्याच्या राजकीय पटलावर आपली मांड ठेवून आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये शेतकरी कामगार पक्षाची ताकद मोठी आहे. सोलापूर जिल्ह्याच्या इतिहासात जिल्हा बँक, दूध संघ, जिल्हा परिषदेत शेकापशिवाय सत्ता स्थापन झाली नाही, असा इतिहास सांगतो. शेकापची हीच ताकद बाबासाहेबांनीही भक्कमपणे ठेवली आहे. राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्याबरोबरचा संवाद कायम ठेवतानाच शेकापचे आमदार जयंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली डाव्या पक्षांचा पुरोगामी विचार डॉ.बाबासाहेबांनी टिकवून ठेवला, नव्हे, आपल्या कृतीमधून त्यांनी तो राज्यभर पोहचवला. विरोधकांनी कितीही टीका केली तरी आपली जनता आणि काम या पलीकडे ढुंकूनही न पाहणारा हा नेता प्रचंड शांत आणि संयमी आहे. दुसऱ्याचे एकून घेतल्याशिवाय त्यावर मत बनवणे, भाष्य न करणे ही पथ्ये ते आवर्जून पाळतात. सचोटी, सभ्यता, साधेपणा ही त्यांची खरी आभूषणे. लोकांच्या प्रश्नांसाठी सतत झगडणारा, त्यांच्या जगण्याशी समरस झालेला हा नेता आगामी विधानसभेत असायलाच हवा यासाठी त्यांच्या कार्यकर्त्यांनी पायाला भिंगरी बांधली आहे. खरे तर आबासाहेबांच्या पश्चात शेतकरी कामगार पक्ष संपेल ही विरोधकांनी उठवलेली आवई डॉ.बाबासाहेबांनी त्यांच्याच घशात घातली. उत्तम

**शिवाजी हळणवर**

संघटक असलेल्या बाबासाहेबांनी बेरजेचे राजकारण करून एक-एक कार्यकर्ता पक्षाशी जोडला आहे. कोण कुठे सोडून गेले, कुणी दुखावले तर त्याची समझूत घालण्याइतका दिलदारपणा त्यांनी जपला आहे. 'मी नेता, तू कार्यकर्ता यापेक्षा पक्षाशी जोडलेला प्रत्येक व्यक्ती माझा सहकारी आहे' ही भावना जपल्यानेच त्यांच्याभोवती सतत कार्यकर्त्यांचा गराडा असतो. कार्यकर्ता हीच ऊर्जा समजणाऱ्या बाबासाहेब देशमुख यांच्या वाढत्या लोकप्रियतेमुळे आगामी विधानसभा निवडणुकीची समीकरणे पुरती बदलली आहेत. आबासाहेबांचा वारसा चालवायचा असेल तर लोकांमध्ये गेले पाहिजे, त्यांच्या अडीअडचणी समजून घेतल्या पाहिजेत याच उदात्त हेतूने त्यांनी आपले कार्य अविरत सुरू ठेवले आहे. तर दुसरीकडे तो वारसा बाबासाहेबच पुढे नेऊ पाहत आहेत हा विश्वास जनतेमध्ये निर्माण झाल्याने 'आता बाबासाहेबच' ही हाक घराघरांतून दिली जात आहे.

# बार्शी तालुक्यात अजितदादा गटाला भूमकरांशिवाय समर्थक नाही

**अजित पवार यांनी दि. २ जुलै २०२३ रोजी राष्ट्रवादीमध्ये मोठे बंड करत शरद पवार यांच्या नेतृत्वाला आव्हान देत त्यांचे विद्यमान शिवसेना, भाजप सरकारमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला. त्यांच्यासह इतर ९ मंत्र्यानी शपथ घेतली. त्यानंतर या दोन काका पुतणे गटाचे राज्यामध्ये शक्ती प्रदर्शनाचे वेगवेगळे मेळावे झाले. आता राष्ट्रवादीची मालकी कोणाची यावरून निवडणूक आयोगाबरोबरच विविध आघाड्यांवर सुनावणी सुरू आहेत. नुकतेच अजित पवार यांनी बारामतीसह इतर तीन मतदारसंघामध्ये आपला पक्ष लोकसभेची निवडणूक लढवणार असे जाहिर केले आहे. त्याचप्रमाणे अजितपवार यांनी प्रथमच थेट शरद पवार यांच्यावर शरसंधाण केले आहे. त्यांच्या आरोपांना सुप्रिया सुळेंसह शरद पवार यांचे अनेक सहकारी उत्तर देत आहेत. या पार्श्वभूमीवर भविष्यात आता राष्ट्रवादीमधील सुप्रिया सुळे आणि अजित पवार या दोन गटांमधली फुट आणि संघर्ष अटळ झाला आहे. हे दोघे बहिण भाऊ आता भविष्यातल्या राजकारणात एक मेकांचे राजकीय विरोधक असणार हे शक्यता बळावली आहे.**



पश्चिम महाराष्ट्रामध्ये वर्चस्व असलेल्या राष्ट्रवादीमध्ये घडलेल्या या बंडाळीमुळे आता आगामी राजकारणात या दोन नेत्यांचे समर्थक गट तयार होत राहणार हे उघड आहे. बार्शी तालुक्यामध्ये दि. २ जुलै रोजी अजितदादा गटाचा निर्णय झाल्यानंतर सर्वप्रथम वैराग भागाचे राष्ट्रवादी नेते व वैराग नगरपंचायत निवडणूक राष्ट्रवादीच्या चिन्हावर लढवून जिंकलेल्या निरंजन भूमकर यांनी आपण अजितदादा पवार यांच्या पाठीमागे जाणार असल्याची घोषणा केली व ते अजित पवार गटाच्या पहिल्या वाहिल्या मेळाव्याला मुंबईत उपस्थित राहिले. बार्शी तालुक्यात माजी नगराध्यक्ष विश्वास बारबोले हेदेखील राष्ट्रवादीमध्ये सक्रिय आहेत. बारबोले यांनी तातडीने आपण कोणत्या गटाच्या आणि नेत्याच्या पाठीशी राहणार आहोत याबाबत कोणतेही जाहिर मत प्रदर्शन केले नाही. बारबोले यांनी प्रारंभी सावध घेतली. बारबोले हे तालुक्याच्या राजकारणात गेली जवळपास साडेचार दशके सक्रिय असलेले नेते आहेत. त्यांनी वेट ॲण्ड वॉचची भुमिका घेतली. मात्र काही दिवसांनी बारबोले यांच्या लक्षात आले की, आपल्या आगामी राजकारणासाठी स्वतंत्र निर्णय घेणे गरजेचे आहे. त्यामुळे बारबोले यांनी मुंबईत शरद पवार यांची भेट घेतली. आपण कोणाच्या पाठीशी आहोत याबाबत जाहीर भुमिका व्यक्त केली. माजी मंत्री दिलीप सोपल हे सध्या शिवसेनेच्या ठाकरे गटात असल्याचे मानले जाते. सोपल यांनी शिवसेनेत पडलेल्या फुटीनंतरही आपण कोणत्या गटात आहोत याविषयी जाजीर भुमिका घेणे टाळले होते. त्यानंतर सोपल हे राष्ट्रवादीच्या वाटेवर असल्याची रसभरीत चर्चा सुरू झाली होती. बार्शी तालुक्याचे समाज जीवन हे राजकारणाचा प्रभाव असलेले आहे. त्यामुळे बार्शी तालुक्यात राजकीय नेत्यांना कार्यकर्ते आणि जनता राजकारणापासून अलिप्त राहू देत नाही. तरीही सोपल यांच्या कथीत राष्ट्रवादी प्रवेशाचे चर्चा रंगात आली असताना हे काका पुतण्यांचे बंडनाट्य घडले. त्यानंतर अजित पवार यांची या सत्ता सहभागानंतर आलेली भाजपा व शिवसेनाजवळीक लक्षात घेता आगामी राजकारणातील समिकरणांमुळे त्यांच्या विरोधी पक्षातच राहणे सोपलांना क्रम प्राप्त आहे. बार्शी तालुक्यात सध्या सोपलांचे एकमेव प्रबळ विरोधक असलेले अपक्ष आमदार राजाभाऊ राऊत हे पुर्णपणे भाजपाकडे झुकलेले आहेत. त्यामुळे सोपल हे राष्ट्रवादीचा पर्याय स्विकारतील असा अंदाज व्यक्त झाला. मात्र ठाकरे गट व पवारांची राष्ट्रवादी यांची महाविकास आघाडी लक्षात घेतली तर आता सोपल यांना ठाकरे गट व शरद पवार यांचा गट या पक्षातला प्रवेश हा फारसा राजकीय फायदा होणारा नाही. तसेच सोपल हे उतावळेपणे राजकीय निर्णय घेणारे नेते नाहीत ते योग्य वेळेची वाट पाहणार हे नक्की. त्यामुळे सध्या तरी जैसे थे अशीच परिस्थिती ठेवणे सोपलांच्या हिताचे आहे. सोपल हे भविष्यात शरद पवार यांच्या राष्ट्रवादीत जाणार असल्याची शक्यता व्यक्त होत आहे. मात्र जोपर्यंत आगामी स्थानिक निवडणूका जाहिर होत नाहीत तोपर्यंत सोपल आपली राजकीय भुमिका उघड करणार असल्याची शक्यता कमी आहे. मात्र येत्या दि. १६ डिसेंबरला सोपल यांचा वाढदिवस आहे. या वाढदिवसाच्या दिवशी जाहीर सभा घेऊन सोपल आपला नवा राजकीय निर्णय जाहीर करतील, अशी ही चर्चा आहे. येत्या १५ दिवसात सोपल यांचा पवित्रा कळेल.

**सचिन अपसिंगकर**

### वडकबाळच्या सरपंचांना दिलासा

## उच्च न्यायालयाकडून १७ जानेवारीपर्यंत मुदत

**दक्षिण सोलापूर :** वडकबाळ येथील गायरानमध्ये अतिक्रमण केल्याने वडकबाळच्या सरपंच पूजा राठोड व सदस्या अनिता राठोड यांचे पद रद्द करण्याचा निर्णय विभागीय आयुक्तांनी दिला होता. या निर्णयाच्या विरोधात उच्च न्यायालयात अपील केल्यानंतर दि. १७ जानेवारीपर्यंत दिलासा मिळाल्याची माहिती ॲड. अनंत वडगावकर यांनी दिली.

दि. १७ जुलै २०२३ रोजी जिल्हाधिकारी यांनी गायरान जमीनीवरील अतिक्रमणामुळे वडकबाळच्या सरपंच, सदस्य यांचे पद रद्द करण्याचे आदेश दिले होते. मात्र, सरपंच पूजा राठोड यांनी विभागीय आयुक्त कार्यालयात दि. ८ ऑगस्ट २०२३ रोजी जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्णयाला स्थगिती देण्याबाबत अपील दाखल केली होती. त्यानुसार विभागीय आयुक्त कार्यालयाने दि. २१ नोव्हेंबर २०२३ रोजी सरपंच पूजा राठोड, सदस्या अनिता राठोड या गायरान जागेवर अतिक्रमण करीत असल्यामुळे त्यांचे पद रद्द करण्याचा निर्णय दिला होता.



विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सरपंच पूजा राठोड व सदस्य अनिता राठोड यांचे पद रद्द करण्याच निर्णयाला उच्च न्यायालयात दि. १७ जानेवारीपर्यंत दिलासा मिळाला आहे . यासाठी ॲड. अमरीश कोले, संजय चव्हाण यांनी काम पाहिले.

# ५१ टक्के मतांची लढाई जिंकण्यासाठी सुपर वॉरियर्सची नियुक्ती करावी

## मुरलीधर मोहोळ : भाजपच्या जनसंपर्क ते जनसंवाद यात्रेनिमित्त बैठक

सुराज्य/सांगोला

भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे येत्या सात, आठ डिसेंबर रोजी सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार आहेत. 'भाजपचे महाविजय: २०२४' जनसंपर्क ते जनसंवाद यात्रेनिमित्त सोलापूर आणि माढा लोकसभा मतदारसंघातील जनतेशी संवाद साधणार आहेत. राज्यात भाजपची ताकद वाढली आहे. त्यामुळे या पुढील सर्व निवडणुका जिंकून भाजप नवा विक्रम प्रस्थापित करेल. देशात पुन्हा भाजपची सत्ता आणण्यासाठी, ५१ टक्के मतांची लढाई जिंकण्यासाठी तीन बूथसाठी प्रत्येकी एका सुपर वॉरियर्सची नियुक्ती करावी, अशा सूचना भाजपचे प्रदेश सरचिटणीस मुरलीधर मोहोळ यांनी दिल्या.



भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या महाविजय २०२४ जनसंपर्क ते जनसंवाद यात्रेच्या नियोजनाची बैठक सांगोल्यात पार पडली. या बैठकीला भाजपचे प्रदेश सरचिटणीस मुरलीधर मोहोळ, प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, पश्चिम महाराष्ट्र संघटन सरचिटणीस मकरंद देशपांडे, खासदार रणजीतसिंह नाईक-निंबाळकर, आमदार रणजीतसिंह मोहिते-पाटील, आमदार जयकुमार गोरे, आमदार राम सातपुते, माढा लोकसभा निवडणुक प्रमुख माजी आमदार प्रशांत परिचारक, जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत, जिल्हा सरचिटणीस सचिन शिंदे, शशिकांत चव्हाण, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष शंभुराजे जगताप, माढा लोकसभा संयोजक राजकुमार पाटील, योगेश बोबडे, के.के. पाटील, गणेश चिवटे, महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा ज्योती पाटील, जिल्हा सरचिटणीस धनश्री खटके, जयकुमार शिंदे, माऊली हळनवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना खासदार रणजीतसिंह नाईक- निंबाळकर म्हणाले, गेल्या चार वर्षांत सातत्याने भाजपच्या प्रत्येक कार्यकर्त्याला बळ वाढावे, यासाठी सातत्याने प्रयत्न करीत आहे. एकेकाळी राष्ट्रवादीचा बालेकिल्ला असलेला माढा मतदारसंघ भाजपचा झाला आहे. पक्षाची ध्येयधोरणे तळागाळापर्यंत पोहोचवण्याचे काम करीत आहोत. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या दौऱ्यावेळी सर्वच पदाधिकाऱ्यांनी योग्य नियोजन करावे. तीन बूथसाठी प्रत्येकी एका सुपर वॉरियर्सची नियुक्ती करावी अशा सूचना खासदार रणजितसिंह निंबाळकर यांनी दिल्या.

भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या ९ वर्षात समाजातील गरीब आणि वंचित घटकांच्या कल्याणासाठी क्रांतिकारी पावले उचलली आहेत. माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार रणजितसिंह निंबाळकर यांनी माढा लोकसभा मतदारसंघातील पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवून मतदारांना दिलेला शब्द पाळाला आहे. खासदार निंबाळकर यांनी मतदारसंघात कोट्यवधी रुपयांच्या निधी उपलब्ध करून विकास कामांना चालना दिली असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, पश्चिम महाराष्ट्र संघटन सरचिटणीस मकरंद देशपांडे यांनी पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले.

# राजू खरे यांनी सोडविला जामगावचा पाणीप्रश्न

सुराज्य/पंढरपूर

मोहोळ तालुक्यातील कुरुल गटातील जामगाव या गावासाठी पिण्याच्या पाण्याची समस्या भेडसावत होती. गेल्या अनेक वर्षांपासून पिण्याच्या पाण्याची फार मोठी समस्या होती. परंतु कोणीही दाद दिली नाही. ही बाब सामाजिक कार्यकर्ते राजाभाऊ खरे यांच्या निदर्शनास आली. त्यांनी त्वरीत या गंभीर समस्येची माहिती घेतली. त्यानंतर त्यांनी या ठिकाणी तत्काळ स्वखर्चाने बोरवेल मारून स्थानिक लोकांच्या पिण्याचा पाण्याचा प्रश्न सोडविला. त्यामुळे जामगाव ग्रामस्थांनी राजू खरे यांचे आभार मानले आहेत.



पाणीप्रश्नासंदर्भात जामगावातील अनेक ग्रामस्थांनी विविध पुढारी, लोकप्रतिनिधी यांच्यासमोर आपली व्यथा मांडली. मात्र कोणीही त्यांची कैफियत ऐकली नाही, त्यांची व्यथा समजून घेतली नाही. त्यांना साथ कोणी दिली नाही. ते जेव्हा राजू खरे यांच्यापर्यंत आले तेव्हा मात्र राजू खरे यांनी त्यांच्या समस्येचे तत्काळ निराकरण केले. गावकऱ्यांच्या जिल्हा परिषद, पंचायत समिती सभापती, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, आमदार, स्थानिक पुढारी, नेते-मंडळी या सगळ्यांकडे चकरा मारून झाल्या होत्या. मात्र राजू खरे यांनी केवळ पाच दिवसात या ठिकाणी बोरवेल मशीनद्वारे बोर पाडून दिली. येथील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी निकालात काढला. यावेळी मोहोळ विधानसभेचे संपर्कप्रमुख प्रकाश पारवे, तालुका उपप्रमुख अमर सोनवणे, हराळवाडीचे सरपंच लिंगराज होनमाने, जामगावचे माजी सरपंच बाळू डांगे, ग्रामपंचायत सदस्य संजय हाके, महादेव सलगर, सतीश जाधव, आजी-माजी सदस्य ग्रामस्थ, कार्यकर्ते उपस्थित होते.

### राजाभाऊ यांच्या मागे खऱ्याने राहू

जामगावच्या पाणीप्रश्नासंदर्भात सर्व राजकीय पुढारी, नेतेमंडळी यांच्यासमोर व्यथा मांडल्या. मात्र कोणीही दखल घेतली नाही. आमदार, जिल्हा परिषद सदस्य, सभापती सगळे येतात-जातात. पण पाणी काही दिले नाही. ज्यांनी आम्हाला पिण्याचे पाणी पाजले नाही आता त्यांना विधानसभेला पाणी पाजू.

**– समस्त जामगाव ग्रामस्थ.**

## टिप्परच्या धडकेने दुचाकीस्वाराचा मृत्यू

**सोलापूर :** चुकीच्या दिशेने येणाऱ्या टिप्परच्या धडकेने दुचाकी चालक गंभीर जखमी होऊन मरण पावली. हा अपघात मंगळवेढा येथील बोराळे नाक्याजवळ शनिवारी दुपारच्या सुमारास घडला.

सुर्यकांत सदाशिव डांगे (वय-४२, पाटकूल, मंगळवेढा) असे मयताचे नाव आहे. ते शनिवारी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास आपल्या दुचाकीवरून बोराडे नाकाच्या दिशेने निघाले होते. तेथील बँक ऑफ महाराष्ट्राजवळ चुकीच्या दिशेने येणारा (एम. एच.१३-ए.एक्स.- ४९९०) या क्रमांकाचा टिप्परने समोरून धडकल्याने ते गंभीर जखमी होऊन मरण पावले. या अपघाताची नोंद मंगळवेढा पोलिसात झाली.

# दहिगाव येथील शिबिरात ४८० जणांची तपासणी



**नातेपुते : दहिगाव येथे आयोजित मोफत हृदयरोग व छाती रोग निदान, मार्गदर्शन, उपचार शिबिराप्रसंगीचे छायाचित्र.**

**नातेपुते :** दहिगाव (माळशिरस) येथील श्री १००८ महावीर स्वामी दिगंबर जैन यांच्या २४ व्या वार्षिक रथोत्सवानिमित्त आयोजित मोफत हृदयरोग व छाती रोग निदान, मार्गदर्शन, उपचार शिबिराचा ४८० जणांनी लाभ घेतला.

या शिबिरामध्ये शिबिरार्थींची स्पायरोमेट्री-फुफुसाची विशेष तपासणी, इसीजी रक्तातील साखर आदी तपासण्या मोफत केल्या. शिबिरातील रुग्णांमध्ये अँजिओप्लास्टी, बायपास करण्यासारखे रुग्ण आढळल्यास बारामती येथे गिरीराज हॉस्पिटल या ठिकाणी त्या रुग्णांवर मोफत उपचार केले जाणार आहेत.

अध्यक्षस्थानी बारामती येथील सुप्रसिद्ध हृदयरोग तज्ज्ञ डॉ.रमेश भोईटे होते. यावेळी अकलूज येथील डॉ. सौरभ गांधी, चिराग व्होरा, आशुतोष बंडगर, विश्वनाथ चव्हाण, नातेपुते येथील डॉ. माधव लवटे, अक्षय दोशी, सनी गांधी, प्रशांत गांधी, वर्धमान दोशी, उदयकुमार दोशी, तेजस चंकेश्वरा, नगरसेवक अविनाश दोशी, नरेंद्र गांधी, बाहुबली चंकेश्वरा, अमृतलाल गांधी, वैभव शहा, रमेश शहा, शीतल गांधी, श्रीकांत डुड्डू, सरपंच सोनम खिलारे उपस्थित होते.